# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १७/०६/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक १७/०६/२००४ रोजी सभा सुचना क्र. ०५ दि. ११/०६/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ४) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ७) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ८) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| ९) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १०) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ११) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | सदस्य |
| १२) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १३) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| १४) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |

### रजेचा अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**शरद पाटील :-**

सभापती साहेब, सभेला सुरुवात होण्याअगोदर मी जे पत्र दिले होते त्या पत्राचे उत्तर मला काल मिळालेले आहे. पण माझ्या माहितीप्रमाणे आणि येथे उपआयुक्त नाईक साहेब देखील उपस्थित आहेत. त्यावेळेला ठराव असा झाला होता की, तीन नगरसेवकांमध्ये नगरसेवक निधीमधून जे काम केले जाईल, ज्या नगरसेवकांच्या निधीमधून काम केले जाईल. त्यांची नांवे टाकली जातील. वरील मान्यवरांची नांवे आहेत. ते ठिक आहे. पण त्या प्रभागातील ज्या नगरसेवक निधीतून काम केले जाईल त्याचे नांव टाकण्यांत येईल असा ठराव झाला असता. काल मला सचिवांकडून पत्र मिळालेले आहे.

**प्र. सचिव :-**

आमच्या विभागातून नाही, बांधकाम विभागातून आपल्याला पत्राचे उत्तर मिळाले आहे.

**शरद पाटील :-**

बांधकाम विभागातून पत्र आले आहे आणि ठराव असा झालेला की, सर्व नगरसेवकांचे नांव टाकणे जरुरी आहे. माझ्या माहितीप्रमाणे आपण ती कॅसेट वाजवून बघावी. नाईक साहेबांनी त्याच्यावर निर्णय दिला होता आणि तो ठराव असा झाला होता की, नगरसेवक निधीमधून जे काम होईल त्या नगरसेवकांच्या व्यतिरिक्त त्यांना जी नांवे टाकायची आहेत ती नांवे ते टाकू शकतील. मोहन पाटीलांनी देखील त्याच्यात सहभाग होता. त्यांनी सुद्धा तसेच बोलले आहेत आणि त्याप्रमाणे ठराव झालेला आहे. तरी ह्या ठरावाबद्दल क्लेरिफिकेशन सभापती महोदय आपण बांधकाम खात्याला विचारावे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेब, जर काही चुक झाली असेल तर स्थायी समितीच्या ठरावाप्रमाणे दुरुस्ती केली जाईल.

**शरद पाटील :-**

धन्यवाद.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य शरद पाटील असे म्हणतात की, तो ठरावच तसा झालेला आहे. म्हणजे बघून सांगण्याचा प्रश्नच येत नाही. ठरावाचा हवाला दिला आहे. त्यांनी वेग दिलेला नाही की, ठिक आहे असे डिसीजन घेतले. त्यांनी त्याच्यामध्ये ठरावाचा हवाला दिला आहे. बांधकाम विभागाने ठरावाचे नमुद केले आहे की, त्या ठरावामध्ये असे झालेले नाही म्हणून आपण ते पत्र पहिल्यांदा वाचा.

**शरद पाटील :-**

सभापती साहेब, बांधकाम विभागाने क्लेरिफिकेशन दिले आहे की, ठरावच असा झाला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

डिपार्टमेंन्टला ते ठराव पाठवून द्या.

**शरद पाटील :-**

तिन्ही नगरसेवकांची नांवे टाकायला लागतील असे त्यांनी सांगितले आहे. साहेब, आपणच त्यांची रुलिंग दिली होती की, नगरसेवक निधीमधून जे काम होईल. त्या नगरसेवकांचे नांव लिहायचे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

असे ठरले होते की, एकाच नगरसेवकाने स्वतःच्या निधीतून खर्च केला असेल तर त्याचे एकट्याचे नांव राहील. जर तीन नगरसेवकांनी मिळून एकत्र त्यांची निधी खर्च केली तर त्यांचे नांव लिहिले जाईल. समजा चार नगरसेवकांनी मिळून एकत्र निधी खर्च केला असेल तर चारही सदस्यांची नांवे येतील असा निर्णय दिला होता. तरी मी ठराव बघून घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब. त्या सभेला जी रुलिंग झाली आम्ही जसे ह्या सभेला येतो, बांधकाम विभागाचे कोण अधिकारी होते. त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. ही भांडणे लावायचे धंदे आहेत. आम्ही असे सभापती साहेबांना सांगतो की, आदेश द्या. हे जे अधिकारी वर्ग येथे बसतात ते कशाकरिता बसतात. मा. आयुक्त, साहेबांनी मा. सभापती साहेबांनी जे आदेश दिले आहेत त्याचे इम्प्लिमेंन्टेशन हजर असलेल्या अधिकाऱ्याने डिपार्टमेंन्टला दिले पाहिजे. त्या तारखेला जो अधिकारी हजर होता त्याच्यावर कार्यवाही करा. हे नगरसेवकांमध्ये भांडणे, मारामाऱ्या वाढवतात आणि वरुन लेखी देतात.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हे जे उत्तर दिले आहे ते ठराव वाचूनच दिले असेल ना?

**मिलन म्हात्रे :-**

ठरावाचेच मी तुम्हांला सांगतो. ह्या महापालिकेमध्ये माझ्या माहितीनुसार आता गेल्या मा. महासभेचे ठराव आणि कॅसेटचे संपूर्ण रेकॉर्डींग बदलण्याचे धंदे सुरु होणार आहेत हे मी तुम्हांला स्पष्ट सांगतो. त्याच्यात जो कोणी बदल करेल, महापालिका प्रशासनाने जर त्याच्यावर कार्यवाही केली नाही तर आम्ही स्वतः पोलिस फौजदारी करु. प्रोसिडींगमध्ये, कॅसेटमध्ये सगळ्यामध्ये बदल करण्याचा प्रयत्न होणार आहे. मला अगदी कॉन्फीडेन्शीअल बातमी मिळालेली आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

असे कधीच होणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी सांगतो तुम्हांला ना. आम्हांला ही ॲडव्हान्स माहिती मिळालेली आहे. जे कोण करणार असेल त्याला आम्ही सांगतो, तसे करु नका. कराल तर आम्ही लटकवून टाकू, सोडणार नाही. कुठल्या एका अधिकाऱ्याला वाचविण्याकरिता तुम्ही तुमची सर्व्हिस टांगणीला लावू नका, ही आमची विनंती आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तसे नियमाप्रमाणे करता येणार नाही आणि केलेही जाणार नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब या ठरावाची आम्हांला खात्री करुन द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण प्रोसिडींगबद्दल बोलतो. ठराव झाला, प्रोसिडींगला मान्यता नाही आणि ठराव कायम झाला. त्याचे डेफिनेशन अधिकारी का बदलतात आणि ते बदललेले ह्या पत्रावरुन दिसून येते.

**मा. सभापती :-**

म्हात्रे साहेब, आपण खांबीत ह्यांना सभागृहात बोलावले आहे. ते आल्यानंतर आपण हा विषय परत घेऊ. आता सभेला सुरुवात करावी.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २५ वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. २ मध्ये सन्मा. सभापती साहेब ह्यांच्या नावाने जी नोंद झाली आहे, त्यांच्या वक्तव्यामध्ये तसे बघायला गेले तर त्यांनी बोलले पाहिजे. आपले इलेक्ट्रोन झोन खुप मोठे आहे. ते इलेक्ट्रोन झोन नसून इलेक्ट्रॉनिक झोन असणार आहे.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, आपल्या परवानगीने बोलतोय. हे जे इतिवृत्तांत दिले आहे ते पुर्ण आहे का अपुर्ण आहे ह्याची आपण पहिल्यांदा माहिती द्या.

**प्र. सचिव :-**

हे इतिवृत्तांत पूर्ण आहे.

**शरद पाटील :-**

मला वाटत नाही हे इतिवृत्तांत पूर्ण आहे. कारण माजी सभापती मोहन पाटील ह्यांनी केलेले संभाषण ह्याच्यामध्ये आलेले नाही आहे. आम्ही केलेला विरोध ह्याच्यामध्ये नाही आहे. जो सर्व्हेअरसाठी ठराव झाला होता त्याला आम्ही विरोध केला आहे.

**प्र. सचिव :-**

ते इतिवृत्तांत आपल्याला पुढच्या सभेत देण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपली ही जी सभा झाली २९/०५/२००४ ला आणि आपण ह्याच्यामध्ये दिले आहे की, सन्मा. महोदय हा विषय मा. महासभेचा आहे. हा धोरणात्मक विषय आहे. पान नं. ४ वर हा जो रिझर्व्हेशनबद्दल तर आता ही जी मा. महासभा लागेल ह्याच्यामध्ये आपण त्याच्यावर काय कार्यवाही केली आहे का? कारण महासभेला जास्त दिवस राहिलेले नाही. मा. महासभा कधी लागणार आहे?

**प्र. सचिव :-**

मा. महापौर मॅडमना विचारणा करतो.

**मिलन म्हात्रे :-**

आजची सतरा तारीख आहे आणि वीस तारखेपर्यंत आपल्याला बंधन आहे. ते बंधन अव्हॉइड कोण करणार नाही. कारण आता इलेक्शन वगैरे काहीही नाही आहे. सचिव साहेब तुमच्याकडून अजून ह्याच्यावर सुचना निघालेली नाही.

**प्र. सचिव :-**

विषयानंतर सभा लावू शकतो. आता ही आपली सभा रेग्युलर झाली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या स्थायी समितीच्या प्रोसिडींगला नोंद झाले व एवढा महत्वाचा विषय मा. महासभेला गेला पाहिजे त्याच्याबद्दल कार्यवाही काय? नाहीतर आपले दरवेळेला असते, गोषवारा नाही. पान क्र. ८ मध्ये केळकर साहेबांनी बोलले आहेत, पण आता नाही. आम्ही सीयाट कंपनीकडून प्रति नगास रु. २,५९६/- किंमतीने टायर घेतो. पण टायर हे कुठले आहेत, कुठल्या गाडीचे आहेत, काय आहे त्याचे स्पष्टीकरण नाही आहे. टायरचा नंबर नाही आहे. म्हणजे ह्या इतिवृत्तांताला जर आम्ही मंजूरी दिली तर त्याची सुरुवात होईल म्हणजे ती अमाऊंट दाखवून कमीचे टायर आणायचे आणि अमाऊंट तिथे भरायचे. हे सर्व पुढे आलेले आहे. त्याच्याबद्दल मी तुम्हांला नंतर सांगतो. त्याच्यामध्ये केळकर साहेबांनी रक्कम क्लिअर केली आहे. पण कंपनी, नंबर, मेक आणि त्याचा प्रकार व कुठल्या वाहनाचा प्रकार आहे हे कुठेही दिलेले नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

जेवढा तुम्ही प्रश्न विचारणार तेवढ्याचेच उत्तर दिले आहे. वर मसुदा आलेला आहे. तुम्ही जो प्रश्न विचारला की, किंमत एवढी असेल त्याचे त्यांनी उत्तर दिले आहे. जर तुम्ही सविस्तर उत्तर मागितले असते तर त्यांनी सविस्तर उत्तर दिले असते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, असे नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण वर विचारलेल्या प्रश्नाशी कनेक्टेड हे उत्तर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्या दोन्ही गाड्यांचा एक टायर नाही आहे. मी सगळा अभ्यास करुन बसलो आहे. माझे म्हणणे एवढे आहे की, आपण हे फक्त क्लिअर करा. रु. २,५९६/- हे कुठल्या गाडी आहेत हे आपण क्लिअर करा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

४०७ चे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ९ मध्ये केळकर साहेबांचे स्टेटमेंट आहे. कचऱ्याच्या टेम्पोचे फक्त टायर मागविण्यांत आलेले आहेत. नगरपालिकेच्या वाहन विभागामध्ये कचऱ्याचा टेम्पो चालतो का? कारण मला माहिती आहे की, आपण डंपर वगैरे सर्व भाड्याने घेतलेले आहे. फेऱ्यावर आपण डंपर दिलेले आहे आणि जे ४०७ वगैरे चालतात ते खाजगी चालतात. मटन, मच्छी, ओला कचरा, मांस वगैरे सर्व तर कचऱ्याचा टेम्पो कुठे आहे?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

टेम्पो ऐवजी डंपर ही दुरुस्ती करण्यांत यावी.

**मिलन म्हात्रे :-**

४०७ हा आपल्या आरोग्य विभागामध्ये कुठेही नाही आहे. जो मागचा रेट दिला आहे तो आपल्याकडे आरोग्य विभागामध्ये नाही आहे. त्यामुळे डंपर असले पाहिजे आणि डंपर जर असेल.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

४०७ चे ॲम्ब्युलन्स आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पण त्यांनी कचऱ्याचा टेम्पो दिला आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

टेम्पो ऐवजी डंपर करावे.

**मिलन म्हात्रे :-**

मग त्या रेटमध्ये फरक होईल. साहेब, वाहन विभागावर आमचा पाच पैशाचा विश्वास नाही. आपण उपआयुक्त, सभापती, कमिशनर आणि पदाधिकारी, विरोधी पक्षनेते, सभागृह नेते ह्यांच्या गाड्यांची हालत काय आहे हे आम्हांला माहिती आहे. गाड्या आपण वापरता पण चिंता आम्हांला आहे. गाड्या मध्ये बंद पडतात आणि अर्ध्या रस्त्यामध्ये ह्या पदाधिकाऱ्यांना आणि सगळ्यांना गाड्या सोडून यावे लागते. आजच्या माझ्या माहितीनुसार महानगरपालिकेच्या गाड्या चार ठिकाणी अशा बेवारस अवस्थेमध्ये आहेत की, ती प्रॉपर्टी आपली आहे. लाखो रुपयांची प्रॉपर्टी रस्त्यावर पडून आहे

आणि त्याच्या बॅटऱ्या चोरीला गेल्या आहेत, रेडीएटर काढले आहेत, इंजिनचे काही पार्ट काढले आहेत. आपण सभा संपल्यानंतर माझ्याबरोबर या. मी तुम्हांला गाड्या दाखवतो. काय चालले आहे? आम्ही लाखो रुपयांची मंजुरी द्यायची आणि गाड्यांचे ठिकाणे नाही आहेत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

श्री. दोंदे गाड्या रस्त्यावर आहेत का?

**मिलन म्हात्रे :-**

नाही म्हणून त्यांनी बोलू दे. त्यांना मी गाडीत घालून घेऊन जातो.

**संजय दोंदे :-**

दुरुस्तीचे टेंडर काढले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कसले दुरुस्तीचे टेंडर काढता? त्या गाड्या मेन रोडला बेवारशी पडल्या आहेत. माझी स्कूटर उत्तनपर्यंत बरोबर जाईल पण तुमची गाडी मध्येच कुठेतरी मुर्ध्याला थांबेल.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

दोंदे, म्हात्रे साहेब माहिती देत आहेत की, रस्त्याला चार गाड्या मेन रोडला उभ्या आहेत. तर त्या गाड्या कुठे उभ्या आहेत आणि दुरुस्तीला असल्या तर गॅरेजला आणि महानगरपालिकेच्या प्रिमायसेसमध्ये पाहिजे. पण त्या रस्त्यावर का?

**मिलन म्हात्रे :-**

त्या गाड्या रस्त्यावर उभ्या नाहीत असे तुम्ही नाही बोला. ठणकावून सांगा की, एकही गाडी रस्त्यावर नाही.

**चंद्रकांत वैती :-**

म्हात्रे साहेब, आपणच माहिती द्या की, ती गाडी कुठे आहे?

**मिलन म्हात्रे :-**

आधी त्यांनी सांगावे. मी नंतर सांगेन की, त्या गाड्यांची चोरी झाली तर हे जिम्मेदारी घेतील?

**चंद्रकांत वैती :-**

आपण असे बोलता ना की, येथे कुणाला पडलेलीच नाही. तर तसे नाही आहे. तर आपण स्पष्ट सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

सभेमध्ये रेकॉर्ड होत आहे आणि त्यांनी सांगावे की, गाडी बेवारशी पडलेली नाही.

**आसिफ शेख :-**

पिठासीन अधिकारी साहेब, त्यांना खुलासा करायला सांगा. आहे तर आहे म्हणा किंवा नाही तर नाही म्हणा. आपला कारभार पारदर्शक आहे त्यामुळे चिंता करण्याची आवश्यकता नाही.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, हे अधिकारी आहेत. ह्यांच्याकडे माहिती अपुरी दिसते. आपल्या माहितीत, आपल्या निदर्शनात आलेली गोष्ट आहे. आपण ह्या ठिकाणी सभागृहामध्ये सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी फक्त म्हणावे की, ह्या गाड्या नाही आहेत. माहिती अपुरी आहे तर सांगा की, ह्या गाड्या आमच्याकडे नाही आहेत किंवा मिलन म्हात्रे हे चुकीचे बोलतात.

**चंद्रकांत वैती :-**

मा. स्थायी समिती सदस्य मिलन म्हात्रे आपण ह्या बाबतीत स्पष्टपणे सांगावे की, गाड्या कुठे आहेत. त्याप्रमाणे आपल्याला योग्य ती कार्यवाही करता येईल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी सांगायला तयार आहे आणि फक्त त्यांनी सांगावे की, आमच्या गाड्या नाहीत. माझा एकच आग्रह आहे.

**चंद्रकांत वैती :-**

गाड्या असतील. पण असे वेठीस न धरता आपण आपल्याकडील माहिती द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

मी वेठीस कुठे धरतो. व हे प्रशासन आहे आणि ही सभा आहे. वेठीस वगैरे हा प्रकार नाही आहे.

**चंद्रकांत वैती :-**

त्यांना माहिती नाही तर आपण आपली त्यांना माहिती द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

राई गावाच्या येथे आपली एक गाडी बंद आहे. तर ती कचऱ्याची गाडी आणि तो मोठा ट्रक आहे. बारीक गाडी नाही. जीप वगैरे कुठे कोपऱ्यात असेल ती. जर आपण हे देखील नाही म्हणून सांगा, मग मी ती नेऊन तुम्हांला दाखवतो. त्याची बॅटरी चोरीला गेली आहे. इंजिनचे पार्ट चोरीला गेले आहेत. सगळी सहा चाके पंक्चर आहेत. साहेब, आपण नवीन चीफ ऑफीसर असतांना १५ ऑगस्टला ज्या गाड्यांचे उद्‌घाटन झाले त्यामध्ये टाटाची गाडी ज्या तुम्ही चार का सहा आणल्या होत्या त्यातील एक गाडी तिथे पडली आहे.

**शरद पाटील :-**

माहिती नाही म्हणजे कमाल झाली.

**मिलन म्हात्रे :-**

ल्युब्रीकेम कंपनीच्या गेटजवळ पडलेली आहे. तिथे तुमचे अधिकृत गैरेज आहे का?

**चंद्रकांत वैती :-**

एखाद्या गॅरेजमध्ये असेल असे कुठे पडलेली नसेल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण टेंडर देतो.

**चंद्रकांत वैती :-**

टेंडर घेऊन ते गॅरेजमध्ये रिपेरिंगला ठेवले असेल असे पडलेले वगैरे असा प्रकार नाही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी सांगावे की, ते गॅरेज अधिकृत आहे आणि त्याला टेंडर दिले आहे. त्याच्या पुढचा प्रश्न आहे माझा जर गॅरेजमध्ये असेल तर ती गाडी बेवारस अवस्थेमध्ये पडलेली आहे. मेन रोडवर ती गाडी आहे. गॅरेजमध्ये ती गाडी नाही आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ती गाडी बेवारसमध्ये पडलेली नाही. गॅरेजमध्ये गाडी लावल्यानंतर चाक काढणे, चेक करणे हे चालू असते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, हे सगळे चालू असते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मग बेवारसमध्ये असे कसे म्हणता येईल.

**मिलन म्हात्रे :-**

गॅरेजमध्ये गाडी असेल तर त्याला कालवधी देता की नाही. पंधरा दिवस, वीस दिवस, आठवडा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

वाहन विभागाकडून माहिती घेऊन ती देऊ. पण ते वाहन रस्त्यावर पडलेले नाही हे नक्की झाले.

**मिलन म्हात्रे :-**

उपायुक्त साहेब, आपण जे स्टेटमेंट देता तर ते गॅरेज आपल्या रेकॉर्डवर नाही. ते गॅरेज बांधकाम अनधिकृत आहे आणि तुम्ही त्याला कुठलाही ठेका दिलेला नाही. अशा अवस्थेत ती गाडी महिन्यापासून पडलेली आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्याला ठेका दिलेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

नाही, दिला आहे. त्यांनी सांगावे की, त्याला ठेका आहे. कशाला तुम्ही कोणाला सांभाळायची कामे करता?

**चंद्रकांत वैती :-**

ह्याबाबत तातडीने आपण माहिती घेऊ आणि दुसऱ्या तीन गाड्या कुठे आहेत ते सांगा. सगळ्या गाड्यांची माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही केली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

काशिमिरा रोडला दोन गाड्या पडलेल्या आहेत. तिथे रस्त्यावर डांबर मारत होते तर ते महापालिकेच्या ॲम्बेसिडर गाडीवर डांबर पडला होता, फवारणी करतांना. तसेच अननोन गाड्या जिकडे झाल्या आहेत. आपल्या महापालिकेच्या मुख्य कार्यालयात तीन महिने झाले आरोग्य विभागाचे डंपर पडले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

दुरुस्त नसेल, आपल्याकडे दुरुस्तीचे किती वाहक आहेत. तीन चार महिन्यापासून हा प्रश्न आपल्याकडे पडलेला आहे की, आपल्याकडे दुरुस्तीसाठी निविदा काढल्या नाहीत. त्याच्यामध्ये वारंवार अडचणीत येत गेल्या म्हणून आणि महापालिकेच्या आवारात आहे म्हणजे आपल्या जागेत ती गाडी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

गाडी उभी आहे. आम्ही कुठे नाही म्हणतो. पण ती गाडी आज सर्व्हिसपासून वंचित आहे.

**चंद्रकांत वैती :-**

आपण दिलेल्या माहितीप्रमाणे सर्व गाड्या कुठल्या अवस्थेत आहेत. कशामुळे आहेत त्याची माहिती घेऊन आपल्यापुढे सादर केले जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, वाहन विभागातून लाखो करोडो रुपयांची निविदा येते आणि ती वाहने नेहमी सुस्थितीत राहावी. प्रशासनाला सर्व कामाला ती वेळीच उपयोगी पडावी म्हणून आम्ही ह्या मंजूऱ्या देत असतो. परिणामी काय असते तर एक ही वाहन व्यवस्थित नाही आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

संपूर्ण माहिती घेऊन कुठल्या गॅरेजला दुरुस्तीला दिले आहे आणि कुठले वाहन कुठे आहेत ह्याची संपूर्ण माहिती घेऊन पुढच्या सभेत ती माहिती देण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

पण, आपण आता गॅरेज फिक्स करत आहोत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

गॅरेज फिक्स करण्यासाठी आयडेन्टीफाय रजिस्ट्रेशन असते का?

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, हा विषय पुढे येईल.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, मी नेहमीच सभागृहामध्ये ह्याच्यापुर्वी सुद्धा सांगितलेले आहे. ह्या ज्या गाड्या आहेत, त्यांच्यावर आपले जबाबदार ड्रायव्हर, परमनन्ट ड्रायव्हर असतील अशा लोकांची नेमणूक केली पाहिजे. जेणेकरुन त्यांच्याकडून जाबजवाब विचारला जाईल. कुठल्याही गाडीचे काहीही नादुरुस्ती झाली तर त्याचा जाबजबाब विचारला जायला पाहिजे आणि त्याचे उत्तर आपल्याला मिळायला पाहिजे आणि ह्या सभागृहालाही उत्तर मिळायला पाहिजे. आज आपण करोडो रुपयांची मंजूरी द्यायला बसलो आहे. तरी ह्याच्यामध्ये असे पेपर आहेत तर काहीसुद्धा दिसत नाही. मग मंजुरी कशी काय देणार. आज हा गोषवारा काहीही दिसत नाही. कुणाचे नांव दिसत नाही, स्पेअर पार्टचे नांव दिसत नाही, किंमत दिसत नाही.

**चंद्रकांत वैती :-**

सगळ्यांना जे पेज दिले आहे त्याच्यामध्ये तसा प्रकार नाही. झेरॉक्सचे असेल तर त्यांना दिसत नसेल अक्षरे ते दुसरे पेपर त्या संबंधित सदस्यांना देण्यांत यावे. सध्या प्रोसिडींग पूर्ण होऊ दे नंतर हा विषय येईल.

**प्रकरण क्र. २५ :-**

दि. ०३/०६/२००४ रोजींचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ३२ :-**

दि. ०३/०६/२००४ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २६ चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, प्रकरण २६ दलित वस्ती सुधारणेचा विषय आलेला आहे. त्याच्यात भटाचा पाडा, मिनाक्षी नगरमधील रस्ते कॉंक्रीट, सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. माझ्या मते हा रस्ता आताच डांबरीकरण केला आहे. सभापती साहेब, आपण ह्याबाबत विचारणा करा.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या विषयावर मागे ज्योत्स्ना हसनाळे मॅडमनी बरेच बोलले होते. ते काम मंजूर झाले होते. आपण आता तिथे डबल खर्च तर करत नाही ना?

**धनराज अग्रवाल :-**

हा डबल खर्च आला आहे किंवा काय आहे त्याची माहिती आपण द्या.

**चंद्रकांत वैती :-**

कृपया बांधकाम खात्याने खुलासा करावा.

**धनराज अग्रवाल :-**

भटाचा पाडा, मिनाक्षी नगर हा रस्ता झालेला आहे. म्हणजे ते आता डांबरीकरण केलेला रस्ता ते आपण कुठल्या अकाऊंटमध्ये केले आहे. आता परत तो सिमेंट रस्ता करायचा आहे का?

**दिपक खांबित :-**

साहेब, हा भटाचा पाडा कुठे आहे? मिनाक्षी नगर आहे.

**धनराज अग्रवाल :-**

तो डांबरीकरण रस्ता आहे.

**चंद्रकांत वैती :-**

म्हणजे भटाचा पाडा परिसरातील मिनाक्षी नगर येथील रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रश्न आहे.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, तिथे रस्ता आहे.

**दिपक खांबित :-**

भटाचा पाडा मेन रस्ता आणि येथे मिनाक्षी नगर हा आतमध्ये रोड जातो.

**धनराज अग्रवाल :-**

मिनाक्षी नगर आतमध्ये आला का?

**दिपक खांबित :-**

मी तुम्हांला एस्टीमेट देतो.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, आम्ही घोडबंदरला जातो. त्या साईडला आताच जाऊन आलो. आमच्या सोबत खांबीत सो., इंजिनिअर सो., आयुक्त सो. आणि दशोरे साहेबही होते. तिकडे जो घोडबंदरचा डोंगर आहे, ते डोंगर बद्रीनाथ, केदारनाथ येथे जसे कच्चे डोंगर आहेत तसे ते डोंगर आहेत व ते कोसळतात. त्या तिथे कापडिया माती खणतोय आणि ती माती खणण्याचे कारण ते दुसरे डोंगर पुढे येत आहेत. जेव्हा हायवे बनला तेव्हाही तसाच प्रकार झाला होता. मग त्याची ९० फुट मेजरमेंन्ट करुन त्याला सांगितले की, हे डोंगर खोदायला नाही पाहिजे. ते डोंगर पुढे पुढे सरकतात. ते जसे उत्तराकांडमध्ये सरकतात त्याप्रमाणे ते कच्चे डोंगर आहे. खांबीत साहेबही व इजिनिअर साहेबही होते. कारण ते रिर्टलींग होणार आहे व जी माती खोदली त्यातून रिर्टलींग वॉल जाणार नाही आणि आपले लाखो रुपये असेच वाया जाणार आहेत. माझी तुम्हांला एक रिक्वेस्ट आहे, जे माती खणतात तिथे आयुक्त साहेबही होते. आयुक्त साहेबांनी सांगितले की, ते स्वतःची जमीन आहे. आपण पंधरा फुट जागा सोडून खणायला सांगू या. पण माझ्या मते आपण एक पत्र दिले पाहिजे. आमची रिर्टलिंग वॉल आहे व लाखो रस्त्यांमध्ये लावले आहे. त्याच्यामुळे आपण पंधरा फुट जागा सोडली पाहिजे आणि तिथे आपण एक बाऊंड्री लावली पाहिजे. ते आपण लिहून घ्या आणि त्याला आपण ते लेखी स्वरुपामध्ये द्या. तसेच पावसामध्ये जो रस्ता चालू केला आहे तो रस्ता दोन्ही बाजूनी बंद आहे. वर्सोवाच्या बाजूने

दोनशे ते तीनशे मीटरचा रस्ता बंद केलेला आहे. रस्ता बंद करतांना माझ्या हिशोबाने वाहतुकीची आपण कोणाचीही परवानगी घेतलेली नाही. तो मेन रस्ता आहे व तो मेन रस्ता मध्येच बंद नाही पाहिजे. रस्ता करतांना जिथे पाईप लाईन तुटलेली आहे, इलेक्ट्रीक वायर तुटलेली आहे. नागरिकांना त्रास होतोय, पाणी मिळत नाही. तिथे टँकर पाठवतात पण त्या टँकरने पाणी पुर्ण मिळत नाही. आता आम्ही जेव्हा उभे होतो, आयुक्त साहेबही उभे होते तेव्हा तिथे इलेक्ट्रीकचा मोठा स्फोट झालेला, शॉक सर्किट होऊन. त्यानंतर छोटा जो रस्ता जसे कोणी बद्रीनाथ आणि केदारनाथला गेले असेल तशी पगदंडी आहे. तशीच पगदंडी केलेली आहे. त्याच्यात रस्ता केलेला नाही. ह्या घोडबंदर सगळी शाळा ह्या दुसऱ्या बाजूला आहे. बहुतेक सर्व लहान लहान मुले त्या साईडवरुन येतात. कोणीतरी मुलांना ते दबवू शकतो. पण कोणीही तिथे काळजी घेतलेली नाही. ते आताच्या आता मी सांगतो. सगळे ऑफीसर बघून आलेले होते. त्यांना तुम्ही तातडीने ते पाण्याची आणि रस्त्याचे काम पुर्ण झाले पाहिजे. त्याचबरोबर इलेक्ट्रीकचे काम हे असे तीनही कामे पुर्ण केली पाहिजेत.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य धनराज साहेब, आपण जी माहिती दिली त्या माहितीप्रमाणे जो घोडबंदर रस्ता आपण पाहून आलो आहेत जिथे दरड कोसळली. हा रस्ता सन १९७० पर्यंत ह्या रस्त्यावरुन प्रमुख वाहतुक व्हायची. त्यानंतर हायवे रोडची निर्मिती झाली आणि १९८७-८८ च्या दरम्यान ज्या जागेत आज दरड कोसळली त्या जागेचे मालक हरिष कापडिया ह्यांनी ८७-८८ साली माती विकण्यांस सुरुवात केल्यानंतर ह्या मातीच्या दोन मोठ्या धडी कोसळून त्याच्यामध्ये त्यावेळेला १४ माणसे गाडली गेली आणि ती माणसे त्याच्यात मेली. त्यानंतर ह्या विषयाला खूप मोठ स्वरुप आले, खुप राजकीय स्वरुप आले आणि त्यानंतर त्याला रॉयल्टी भरली नव्हती त्याच्यामुळे त्यावेळेला गुन्हा दाखला करायला लावले आणि आपण गेल्या काही वर्षापासून नगरपालिका कारकीर्दीपासून त्याला रिटलींग वॉल बांधायला घेतले. गेल्यावर्षी २७ लाखाचे टेंडर काढले होते. त्यावेळेला मी स्वतः सदस्य ह्या नात्याने सांगितले की, संबंधित मालकाने ही चुक केलेली आहे. ती आपण करु नये. परंतु सामान्य नागरिकांना तिथे कधीही धोका होऊ शकतो आणि केवळ ती रस्त्याची दरड कोसळते म्हणून तेथून एस.टी. आणि इतर वाहतुक बंद करण्यांत आलेली आहे. मात्र महानगरपालिकेच्या कारकिर्दीपासून तेथे रिर्टलिंग वॉल बांधून एस.टी. जाण्यासाठी सुरुवात करण्याचा प्रयत्न केला होता. पण आजही धोकादायक असल्यामुळे तेथून एस.टी. जात नाही. आता मात्र तिथे माती कोणीही विकत नाही. ही आमची माहिती आहेआहे.

**धनराज अग्रवाल :-**

माती विकण्याचे अजून चालू आहे आणि साहेब आपला जो रोड तिथे चालू आहे व कमीत कमी दोन हजार गाड्या माती तेथून निघालेली आहे. ती माती तेथून कुठे गेली? साहेब हे आपण त्यांना विचारा व तो भराव कुठे केला आहे तेही तुम्ही त्यांना विचारा. दोन हजार गाड्या माती गेलेली आणि ती माती कुठे गेली आहे तेही मला माहिती आहे आणि ती माहिती मी तुम्हांला सांगेन. पण तुम्ही त्यांना विचारा ती माती कुठे गेली?

**चंद्रकांत वैती :-**

असे असेल तर सभापती साहेब, आपण ह्याबाबत योग्य ती माहिती घेऊन सदर ठिकाणी माती विक्री ताबडतोब थांबविण्याचे आदेश देण्यांत यावे.

**मा. सभापती :-**

बांधकाम विभाग आणि पाणी पुरवठा विभागाला मी सुचना देतो की, घोडबंदर येथे पाणी पुरवठा आणि लाईट, रोड ह्याच्यावर तातडीने कार्यवाही करावी आणि माती कोणी उचलली त्याची माहिती देण्यांत यावी.

**धनराज अग्रवाल :-**

माती उचलली आहे ती माती कुठे टाकण्यांत आलेली आहे? कुठे दुसरीकडे वापरली आहे का? की, आपल्याकडे कुठे भराव केलेला आहे?

**याकुब कुरेशी :-**

धनराज अग्रवालजी आपण विषयाला पकडून बोललात तर चांगले होईल.

**मा. सभापती :-**

खांबित, माती कुठे गेली? कोणाला दिली? हे आपण मला ताबडतोब कळवावे.

**धनराज अग्रवाल :-**

हा काशिमिरा रोडचा विषय आहे.

**याकुब कुरेशी :-**

निविदांना मंजुरी देण्याचा विषय आहे.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, हा काशिमिरा रोडचा विषय आहे. ते आपण बघा आणि ही रोडचीच निविदा आहे.

**याकुब कुरेशी :-**

त्याच्यामध्ये जे रस्ते आहेत त्याचा विषय घ्या. आपण भलता विषय कशाला घेता? कुठलाही रस्ता कशाला घेता?

**धनराज अग्रवाल :-**

आपण बघा, तिथे काय भयंकर स्थिती आहे.

**याकुब कुरेशी :-**

सभापतींनी म्हणून त्याच्यावर आदेश दिले आहेत.

**शरद पाटील :-**

म्हणून त्यांनी सुचविले की, ती माती कुठे गेली हे आपण बघा.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, नैसर्गिक आपत्तीतून आज जी घटना घडली त्याच्यामध्ये विषयपत्रिकेला बाह्यस्वरुप देऊन औचित्याच्या मुद्याद्वारे ह्या सभागृहामध्ये हा विषय उपस्थित करता येतो आणि तो त्यांनी केलेला आहे. त्याच्यापेक्षा वर्तग चर्चा करु या. २६ मध्ये आपण जी दलित वस्ती सुधारणा योजनेचे केलेले आहे तर आपण ह्याचे नांव दलित वस्ती सुधारणा असे देतोय. पण रस्ते मात्र आपण मेन रोडचे करतोय. दलित वस्तीचे डेफिनेशन फार निराळे आहे. त्या वस्त्यांमधले अंतर्गत रस्ते आपण किती तयार केले व सार्वजनिक शौचालये वगैरे किंवा या शौचालयामध्ये आपण खाजगी जे स्कीम देतो, ह्या दलित वस्तीच्या स्कीम भरपूर आहेत. तसे पुस्तक मी मागे पानपट्टे साहेब, हरीश पाटील साहेब ह्यांना दिलेले आहे. असे असतांना दलित वस्तीचा फंड आला की, तो रस्त्यावर खर्च करायचे अशी प्रथा चुकीची आहे. त्याच्यातला काही फंड तुम्ही दलित वस्तीच्या प्रत्यक्ष डेव्हलपमेंटकरिता केला आहे का? आणि दलित वस्ती म्हणजे घोडबंदर आणि घोडबंदर म्हणजे दलित वस्ती हा जो आपल्या अधिका-यांचा ग्रह झाला आहे हा सुद्धा चुकीचा आहे. दलित वस्ती उत्तनला आहे, धावगीच्या पाड्यावर देखील दलित वस्ती आहे. ह्या एरियातल्या वस्त्या आपल्या रेकॉर्डवर कधीच येत नाहीत. जर पाच लाख, दहा लाख रुपये दलित वस्तीसाठी खर्च आला असेल तर त्या सर्व रस्त्यांमध्ये तुम्ही ते डिव्हाईड करा आणि दरवेळेला आता हा दुसरा विषय आला म्हणून मी मुद्दामहून उभा राहून बोलतोय. मागच्या वेळेला सुद्धा आपण रोडच डेव्हलप केले. ती जवळ जवळ पन्नास-पंच्याहत्तर लाखाची अमाऊंट होती. अंतर्गत जी डेव्हलपमेंट पाहिजे ती कुठेच दिसत नाही आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

हे अंतर्गतच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, हे जे रस्ते आहेत हे मेन रोड आहेत. माझे एकच वस्तीचे ऑब्जेक्शन आहे. बाकीच्या वस्त्यांवर अन्याय का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मेजर जी लोकसंख्या आहे ती लोकसंख्या दलित असली पाहिजे व त्या विभागातच ते काम घेता येते. मेजर पन्नस टक्के पेक्षा जास्त पाहिजे.

**दिपक खांबित :-**

साहेब, घोडबंदर आणि ते दोन प्रभाग आहेत ते एस.सी. करिता राखीव आहेत व तिथे दोन जागा आहेत. त्यामुळे तिथली कामे घेतलेली आहेत आणि त्या वस्तीमध्ये जिथे काम करायचे आहे तिथली लोकसंख्या पन्नास टक्के दलित पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

धावगीच्या पाड्यावर १०० टक्के दलित आहेत. तिथे आपण कधी खर्च केला आहे का? त्यांच्यावर अन्याय का? दोन वर्ष, तीन वर्ष, मागच्या वेळेला भांडण झाले होते.

**दिपक खांबित :-**

धावगीला कामे करण्यांत आलेली आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

माझे म्हणणे ते नाही आहे. जो आपला निधी आहे त्या निधीमधून तुम्ही तिथे नियोजन काय केले ते सांगा.

**दिपक खांबित :-**

धावगीला कॉंक्रीट रस्तीकरण केले.

**मिलन म्हात्रे :-**

हे तुम्ही दलित वस्तीमधले केलेले काम नाही आहे.

**दिपक खांबित :-**

दलित वस्तीमधून केले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुम्ही हिशोब द्या कितीचे केले आहे?

**दिपक खांबित :-**

ठिक आहे, आपणांस हिशोब देण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

माझा आग्रह आहे जर पन्नास लाखाचा तुम्हांला निधी आला तर तुम्ही तो लोकसंख्येनुसार डिव्हाईड करा.

**दिपक खांबित :-**

तुम्ही मागणी करा. आपण ह्यावर्षी घेऊ.

**चंद्रकांत वैती :-**

सभापती साहेब, आता जे मिलन म्हात्रे साहेबांनी प्रश्न उपस्थित केला तर त्याच्यामध्ये त्यांनी उल्लेख केला की, घोडबंदर. तर घोडबंदरमधला ह्याच्यामध्ये एकही विषय नाही महत्वाचा आणि मुंबईला अगदी खेटून असलेला जो एस.सी.साठी दोन रिझर्व्ह वॉर्ड होते १० आणि ११ नंबर. तर अकरा नंबर मधला हा जो भाग आहे गावठण पासून ते काशिमिरा झोपडपट्टी, ज्याला जनता नगर झोपडपट्टी असे आपण बोलतो, माशाचा पाडा, डाचकुली पाडा. आज ह्या गावांच्या निर्मितीपासून अस्तित्वात असलेली आहे, आज देखील त्या धारावी परिसरामध्ये मुंबईला अगदी एक किलोमिटर दूर आहे. पण तिथे आजही लाईट नाही, रस्ते नाहीत, आणि आज ह्या माध्यमातून थोडासा विकास होतोय तर ही अतिशय चांगली गोष्ट आहे आणि दलित वस्ती फंडातून हा जो खर्च होत आहे हा सगळीकडे त्यांनी कसा केला आहे आणि कसा नाही हे संबंधित अधिकाऱ्याने मिलन म्हात्रे साहेबांना आणि सभागृहाला याबाबत नंतर खुलासा दिला तर अधिक चांगले राहील. परंतु, ह्या परिसरात आजही आपण गेलात आणि सेंट झेव्हीअर ग्रुप ऑफ स्कुल या शैक्षणिक संस्थेने तिथे शाळा सुरु केली आहे आणि त्या शाळेमध्ये मुले बसमधून जाताना व्यवस्थित जातील की नाही ही शंका येते. एवढे खराब रस्ते आहेत आणि खरोखर हे रस्ते होणे अतिशय गरजेचे आहे. भटाचा पाडा ह्या परिसरात मला वाटते गेल्या काही दोन चार वर्षापासून विकास व्हायला सुरुवात झालेली आहे. पण गावठण मधले महाजन वाडीमध्ये वरती जाणाऱ्या रस्त्यात आजही रस्ते नाहीत, स्ट्रीट लाईट नाहीत, संडास नाहीत, वर लाईट देखील नाहीत आणि लाईट कशामुळे अडलेली आहे तर केवळ त्यामध्ये असणारे काही खाजगी शेती मालकीची आहे. तर त्या खाजगी मालकीच्या जागेतून जायला रस्ता येत नाही. अशी मी तुम्हांला सहा क्षेत्र सांगू शकेन. धारावी देवी उत्सव असतो त्या उत्सवासाठी माशाच्या पाड्यावर आजदेखील जनरेटर घेऊन तिथे पुजा-अर्चा, वार्षिकोत्सव साजरा केला जातो. मग तिथे लाईट का जात नाही. आपण आपल्या अधिकाऱ्यांना वेळोवेळी सांगितले, संबंधित शेतकऱ्यांना बोलावले, त्यांच्याशी निगोशिएशन देखील चालू आहे पण हे निगोशिएशन आता कुठेतरी संपत आले पाहिजे व त्या लोकांना आपण देऊ शकलो पाहिजे. हा जो विषय आलेला आहे तो दलित वस्ती सुधारणा योजनेच्या माध्यमातून. आपल्याला ही रक्कम खर्च करायची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

वैती साहेब, आपण हे जे बोलतात, तर ह्या सर्व एरियामध्ये पायी फिरलो आहे. तिथे घोडबंदर किल्ल्याच्या बाजूला आपल्या महापालिकेने एक संडास बांधले, नाईक साहेब आपण त्यावेळेला मुख्याधिकारी होता. त्याच्यापासून जो वाद सुरु झाला होता आणि आपण आज त्या शौचालयाची अवस्था जाऊन पाहा की, त्याची अवस्था काय आहे आणि तिथे घरी ओरिजनली दलित वस्ती आहे, मी हे म्हणत नाही की, आपण काम करु नका. माझे म्हणणे एकच आहे, मी तुम्हांला परत एकदा सांगतो,

पन्नास लाखाची जर रक्कम असेल तर त्याच्यामधले दहा लाख दुसऱ्या दलित वस्तीला द्या आणि चाळीस लाख रुपये तिथे खर्च करा. पण ती अमाऊंट तुम्ही सगळीकडे स्प्रेड केली. सगळ्यांना काहीतरी द्यावे अशी माझी अपेक्षा आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

म्हात्रे साहेब, तुमचे म्हणणे बरोबर आहे. परंतु प्रश्न असा निर्माण होतो की, दलित वस्तीची जी रक्कम आहे ती लिमिटेड असते आणि एखादे काम पूर्ण करतांना व ही जी कामे ज्यावेळेला घेतली जातात त्यावेळेला प्रशासकीय मंजूरी ह्या सभेने दिली की, येथे काम घ्या. त्यानंतर हे टेंडर निघाले. प्रथम मान्यता देतांना तुम्ही चार नावे घालायची होती. ह्या ठिकाणी सुद्धा तुम्ही प्लॅन एस्टीमेट करतांना.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, त्यावेळेला सुद्धा हीच चर्चा झाली. ही चर्चा दोन वेळा झाली. पाण्याच्या कनेक्शनच्या वेळेला सुद्धा चर्चा झाली.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

आता पहिल्यांदा तुमच्याकडे प्रशासकीय मान्यतेसाठी हा विषय आला होता. ह्या विषयाच्या टेंडर मंजुरीच्या वेळेला इतर कामे का घेतली नाहीत. प्रत्येक काम घेतल्यानंतर इतर कामे का घेतली नाहीत हा विषय होऊ शकतो. परंतु तुम्ही ठराव करा. इतर जे दलित वस्ती आहेत त्यांचे प्लॅन एस्टीमेट बनवा. परंतु, हे जे काम आता प्रशासकीय मंजूरी दिलेलेच टेंडर काढलेले आहे ह्या कामाच्या वेळेला दुसरे का घेतले नाही हा प्रश्न होऊ शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तर तुम्ही तो घ्यावा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

तुम्ही म्हणा की, ह्या ही दलित वस्तीत तुम्ही कामे सुचवावित.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मागच्या वेळेला दोन वेळा सभागृहात विषय आले व त्याच्यावर आमची चर्चा झाली आणि ह्याच्यापुढे घेऊ अशी आश्वासने मिळाली आहेत. पाण्याच्या कनेक्शनच्या बाबतीत केवढी चर्चा झाली. पण कुठेही इम्प्लिमेन्टेशन नाही म्हणून आम्ही हा विषय मांडला.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

दरवर्षी दलित वस्तीत जी रक्कम मिळते. एका वर्षी ती रक्कम येथे वापरा व दुसऱ्या वर्षी ती रक्कम दुसऱ्या ठिकाणी वापरा असे करण्यांत यावे.

**चंद्रकांत वैती :-**

मिलन म्हात्रे साहेबांनी जो संडासाचा प्रश्न मांडला तर ते संडास बांधण्यासाठी त्या लोकांसाठी आपण त्यावेळेला मागणी केली व ती मंजूर झाले व ते संडास सुरु देखील झाले. पण एम.टी.डी.सी.च्या गेस्ट हाऊसवाल्यांनी त्याला ऑब्जेक्शन घेतले की, तर ह्याबाबत मला पूर्ण माहिती आहे आणि त्या संडासची दुरावस्था वगैरे झालेली नाही. तर त्या एम.टी.डी.सी.वाल्यांचा विरोध होता आणि आजही ते तेथून जागा शिफ्टींग करण्यासाठी प्रयत्न करत आहेत व तिथे झालेली जी झोपडी आहे. जी आज तिथे १५/२० वर्षापासून आहे व ती काढून टाकावी अशी त्यांची मागणी आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

वैती साहेबांनी जी माहिती दिली की, लाईट आणि पाणी देण्यासाठी शेती आड येते. तर प्रत्येक सर्व्हे नंबरच्या मधून रस्ता दिला पाहिजे असा नियम आहे. मग त्या नियमानुसार तुम्ही तसे का करत नाही?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

नियम तसा नाही आहे.

**मोहन पाटील :-**

हा विषय शेतकऱ्यांच्या जागा असतात त्यांनी बांधावरुन जायचा विषय असू शकतो.

**याकुब कुरेशी :-**

घोन्सालवीसजी आपण जो नियम बोलता तो नियम पायवाटेचा आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

एका सर्व्हे नंबरवाल्याने दुसरा सर्व्हे नंबर ले आऊट मंजुर करुन घेतल्यानंतर द्यावा लागतो. म्हणजे ह्या जमीन मालकाने ले आऊट मंजुर करुन घेतला तर पाठीमागच्या सर्व्हे नंबरला रस्ता द्यायचा. तो मंजुर करुन घ्यायलाच आला नाही तर प्रश्न येत नाही. त्यामुळे नगरपालिकेने केबल आणि रोड यासाठी लॅन्ड एक्वीशियन करावे लागते किंवा निगोशिएशन करावे लागते.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मग आपण तसे करा. मग त्यांना उगीच कशाला ह्याच्यामध्ये ठेवता.

(सन्मा. सदस्य श्री. चंद्रकांत वैती यांनी प्रकरण क्र. २६ च्या ठरावाचे सभागृहात वाचन करुन ठराव मांडला.)

**मोहन पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे व दुसरी गोष्ट अशी की, ह्या चर्चेमध्ये जो सहभाग घेतला होता सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे व जोजफ घोन्सालवीसजी तर सभापती महोदय ह्याच्यामध्ये आपण संपूर्ण भागामध्ये आपल्या जेवढ्या दलित वस्त्या आहेत त्या सुधारण्याच्या दृष्टीकांनातून त्याचा फंड किती आहे व त्याला किती काम आहेत ह्याचे ॲनालिस करावे व त्याप्रमाणे त्या कामांना पुढे प्राधान्य द्यावे असे बोलून मी ह्या ठरावाला अनुमोदन देत आहे.

**प्रकरण क्र. २६ :-**

निविदांना मंजूरी देणे.

**ठराव क्र. ३३ :-**

दि. २७.०५.०४ रोजीचा ''दैनिक लोकमत'' या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालील कामाकरिता ठेकेदारानी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत . (दलित वस्ती सुधारणा योजना)

**दि. २७.०५.२००४ ''दैनिक लोकमत''**

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित रक्कम/दर |
|---|---|---|
| १. | भटाचा पाडा मिनाक्षी नगर मधिल रस्ते सिमेंट कॉंक्रीट करणे. | रु. ११,८७,४९३/- |
| | ७. मे. व्ही. पी. अहिरे | ३.५०% जास्त दराने |
| | ८. श्री. ट्रेडर्स | २.००% जास्त दराने |
| | ९. मे. जे. जे. शहा | ५.००% जास्त दराने |
| २. | मांडवीपाडा सेंट झेवियर्स हायस्कूल ते शनिवार हिंगे यांच्या घरापर्यंत रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे. | रु. १७,९५,८७४/- |
| | ७. व्ही. पी. अहिरे | ३.५०% जास्त दराने |
| | ८. श्री. ट्रेडर्स | २.००% जास्त दराने |
| | ९. मे. जे. जे. शहा | ५.००% जास्त दराने |
| ३. | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर गावठण येथे श्री. महाविष्णू मंदिरापासून नविन गावठण पर्यंत रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे. | रु. २३,०८,४५७/- |
| | ७. मे. व्ही. पी. अहिरे | ३.५०% जास्त दराने |
| | ८. श्री. ट्रेडर्स | २.००% जास्त दराने |
| | ९. मे. जे. जे. शहा | ५.००% जास्त दराने |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ठेकेदारांनी सादर केलेल्या सर्वात कमी दराच्या निविदा ह्या वाजवी आहेत.

**दि. २७.०२.२००४ दैनिक लोकमत''**

क्र. १ च्या कामाकरिता मे. श्री. ट्रेडर्स यांनी सादर केलेली अंदाजपत्रकातील दरापेक्षा २.००% जास्त दराची निविदा, क्र. २ च्या कामाकरीता मे. श्री. ट्रेडर्स यांनी सादर केलेली अंदाजपत्रकातील दरापेक्षा २.००% जास्त दराची निविदा, क्र. ३ च्या कामाकरिता मे. श्री. ट्रेडर्स यांनी सादर केलेली अंदाजपत्रकातील दरापेक्षा २.००% जास्त दराची निविदा, हि वाजवी आहे. सदर निविदांना व वेळोवेळी ठेकेदाराची देयके प्रदान करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार मंजूरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २७ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, प्रकरण क्र. २७, ह्याच्यामध्ये ॲक्युप्रेशर निसर्गोपचार सुरु करणेबाबतचा विषय आहे. विषय हा आरोग्याशी निगडित आहे. परंतु, माझ्या माहितीनुसार मी आपल्याला सांगू इच्छितो की, ॲक्युपंक्चर रिसर्च किंवा ॲक्युप्रेशरची जी वैद्यकिय सेवा आहे ही प्रामुख्याने शरीरामध्ये सुया टोचून केली जाते. म्हणजे आपल्या शरिरात ज्या नसा असतात डोक्यापासून पायापर्यंत त्याच्यात सुया टोचल्या जातात आणि आपल्याला ती वैद्यकिय सेवा दिली जाते आणि ह्या सेवेला सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातलेली आहे. त्याकरिता हा विषय सभागृहापुढे चुकीचा आलेला आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

निसर्गोपचार केंद्र आपण सुरु करत आहोत. ॲक्युपंक्चर नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, येथे ॲक्युपंक्चर असे लिहिले आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

ॲक्युपंक्चर नाही तिथे ॲक्युप्रेशर असे पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

डॉ. शिरिषजी ठाकूर हे जे तज्ञ आहेत ते संचालक, ॲक्युपंक्चर रिसर्च ॲन्ड ट्रेनिंग स्कुल, मुंबई अशी नोंद आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही आहे. हे बघा, मी खाजगी एखादा व्यवसाय करणे, भले कोर्टाचे नियम आहेत. तो भाग निराळा. पण आपल्याला मान्यता देणे, त्याचे तुम्ही पहिले खातरजमा करा आणि हा विषय पुढच्या सभेला ठेवा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

कृपया, त्याच्यात ॲक्युपंक्चर ऐवजी ॲक्युप्रेशर असा बदल करावा.

**मिलन म्हात्रे :-**

आपण त्या नियमामध्ये काय तरतुद आहे ती बघा आणि त्यानंतर आपण विषय घ्या.

**चंद्रकांत वैती :-**

हा विषय जर पुढच्या सभेत घेणार असाल तर त्यामध्ये आणखीन अशी सुधारणा घ्या की, त्याच्यासाठी जुन्या महापालिका कार्यालयातील किती जागेची व्याप्ती करणार आहोत. कारण त्या आरोग्य केंद्रात रोज सरासरी १०० ते १२५ लोक औषधोपचारासाठी येतात. तर ह्याच्यामध्ये किती लोक येतील.

**शरद पाटील :-**

त्याच्या अटीशर्ती देखील देण्यांत यावे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य वैतीजींनी प्रस्ताव मांडला आहे. तर मला ह्या ठिकाणी असे बोलायचे आहे की, आपली आरोग्य केंद्र सुरळीत चालली आहे व ती चालायला पाहिजे. त्यांना जागा हवी आहे, औषधे हवी आहेत किंवा त्यांना आणखीन काही हवे आहे हे करा आणि त्याच्यासाठी ॲडीशनल जागा बघा आणि ती जागा बघून दुस-या जागेवर काय करायचे आहे ते करा आणि एक चांगली सुविधा चालेल, त्याच्यामध्ये जर मला ताप येत आहे. तो बरा होत नाही म्हणून सांगेल, चला घुसा आतमध्ये व सुया टोचून घ्या. ॲक्युप्रेशर किंवा ॲक्युपंक्चर काय आहे ते करा. टायर पंक्चर करुन घ्या. हे कशाला पाहिजे? सुरळीत आहे ती आपण व्यवस्थित चालवा. टायर पंक्चर होईल जर दुसरी गोष्ट काय आहे ते बघाल. कृपया, सन्मा. सदस्य वैतीजी ह्यांनी ह्या ठिकाणी जी सुचना मांडली आहे त्या सुचनेचा विचार करा आणि ह्याची सविस्तर माहिती घ्या व ही माहिती घेतांना आपण गटनेत्यांना बोलवा आणि त्यांची सुचना घ्या व नंतर आपण हा विषय सभागृहासमोर आणा. धन्यवाद.

**प्रकरण क्र. २७ :-**

जूने पालीका कार्यालय आरोग्य केंद्र येथे ॲक्युप्रेशर निसर्गोपचार विभाग सुरु करणेबाबत.

**ठराव क्र. ३४ :-**

मा. सभापती सोा. यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत ठेवण्याचे सुचित करण्यांत आले.

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २८ चे वाचन केले.)

**चंद्रकांत वैती :-**

सर्व सदस्यांचा प्रश्न जिव्हाळ्याचा म्हणजे स्ट्रीट लाईटचा. सगळ्यांचा भावना एकत्रितरित्या सांगतोय ते आपण आपल्या दर्शवाव्यात. परंतु, बऱ्याच ठिकाणी आपण मागणी केली आहे व प्रस्ताव मंजूर आहे. पण अजूनपर्यंत स्ट्रीट लाईट का लागत नाही. तर सर्व सन्मा. सदस्यांच्या सुचना ऐकून त्यानंतर अधिकाऱ्यांनी स्पष्टपणे सांगावे.

**मोहन पाटील :-**

चार ते दहा महिन्या अगोदर आम्ही काही ठिकाणी ब्रॅकेट लावावे म्हणून सांगितले होते. पण ते ब्रॅकेट अजून लागतच नाही.

**चंद्रकांत वैती :-**

केळकर साहेब, हा गंभीर प्रश्न आहे. त्यामुळे बी.एस.ई.एस. ऊर्फ रिलायन्सचा अधिकारी जर येथे उपस्थित असता तर आपल्याला अधिक चांगले उत्तर मिळू शकेल. कारण हे प्रस्ताव पूर्ण होतच नाही. नुसती ती कागदावर येतात.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, आपण खांबितजींना विचारा. आम्ही जो ब्रॅकेटचा प्रस्ताव दिला होता तर ते ब्रॅकेट अजूनपर्यंत का बसले नाहीत?

**दिपक खांबित :-**

सगळे प्रस्ताव पाठवले आहेत आणि त्याच्यावर कामकाज सुरु आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

खांबीतजी त्याच्यावर पुर्तता कशाला होत नाही?

**दिपक खांबित :-**

साहेब, पुर्तता होते.

**हॅरल बोर्जीस :-**

पुर्तता कुठे होते. मी तुम्हांला दोन उदाहरणे देतो.

**शरद पाटील :-**

आम्ही चार उदाहरणे देतो.

**मा. सभापती :-**

खांबित ह्या बी.एस.ई.एस.वाल्यांना उद्या किंवा परवा बोलावून घ्या, ह्या दोन दिवसांत. नाहीतर त्यांची लाईट बंद करायची आणि आपल्याला टाटावाल्यांची लाईट घ्यायची आहे. एक वर्षापासून हे चालू आहे.

**चंद्रकांत वैती :-**

टाटा स्ट्रीट लाईट लावत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती साहेब, अधिकाऱ्यांना आजच वरिष्ठांना फोन करायला सांगा आणि दोन दिवसामध्ये त्यांच्याकडून टाईम घेऊन तुमच्या दालनामध्ये त्यांची सभा घ्या.

**आसिफ शेख :-**

ठरावामध्ये १ ते २६ ला मंजूरी आणि ॲडीशनल प्रस्ताव घ्या.

**चंद्रकांत वैती :-**

ह्याच्यामध्ये ॲडीशन घ्या.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, आपण असा एक विषय आणा. ह्या विषयावर आपण टाटाची नांवे लावावी असा ठराव मांडून घ्या आणि आपल्याला अडचणी येत असतील ते शासनाकडे प्रस्ताव पाठवून त्यांची मदत घ्या.

**याकुब कुरेशी :-**

मला असे वाटते. ह्याच्यामध्ये भावना आणि कल्पना आहे. म्हणून हा विषय एवढा लांबतोय.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कृपा करुन प्रत्येक सभासदाने एक-एकट्याने बोला म्हणजे सगळ्यांच्या लक्षात येईल.

**याकुब कुरेशी :-**

मागच्या मा. महासभेमध्ये बी.एस.ई.एस. बद्दल एवढे रामायण घडले. त्याच्यानंतर ठरवले की, टाटाला बोलावून आपण विचारपूस करावी आणि मिरा भाईंदरमध्ये त्यांची केबल यावीत या उद्देशाने ठरवले होते. त्याचे काय झाले? आपल्या अधिका-यांनी काय पुर्तता केली? त्याची माहिती द्या.

**मा. सभापती :-**

खांबितजी पुढच्या येणा-या स्थायी समितीमध्ये आपण बी.एस.ई.एस.च्या अधिका-यांना बोलावून घ्या.

**याकुब कुरेशी :-**

मागच्या मा. महासभेत असे ठरले होते की, टाटा इलेक्ट्रीकला बोलावून सविस्तर माहिती घ्यावी असे ठरले होते. ती माहिती आपल्याकडे उपलब्ध आहे का?

**दिपक खांबित :-**

टाटा इलेक्ट्रीक बरोबर पत्रव्यवहार केला तर ते म्हणतात की, बी.एस.ई.एस. आपल्याला स्ट्रीट लाईट फुकट लावून देते आणि फक्त त्याचे महिन्याला बिल येईल. तर टाटावाले हे स्ट्रीट लाईट कुठेच लावत नाहीत आणि त्यांनी आपल्या ह्या प्रस्तावावर काहीच उत्तर दिले नाही.

**याकुब कुरेशी :-**

ठिक आहे, स्ट्री लाईटचा जो प्रश्न आहे तो आपण विचारात ठेवू या. परंतु, ज्या नागरिकांना असुविधा होत आहे त्यांच्याबद्दल तरी विचार करु. जर कॉम्पीटीशनला जर कोण आला तर समोरचे लोक थंड होतात.

**दिपक खांबित :-**

आपण त्यांना एन्ट्रीपण दिली. टाटावाल्यांना केबल टाकायला परमीशन दिली आणि त्यांनी केबलही टाकले. पण ते लाईटच लावत नाही.

**याकुब कुरेशी :-**

त्याच्यासाठी आपण कायदेशिर पुर्तता करु या.

**मोहन पाटील :-**

स्थायी समितीत सोळा सदस्य आहेत. त्यांचा आपण मोर्चा काढू या.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपण आता ह्या लाईटवर बोलतोय. तर त्यापेक्षा विचित्र आणि भयानक परिस्थिती अशी आहे की, प्रत्येक लाईटच्या खाली जो बॉक्स असतो तो शहरात बहुतेक ठिकाणी उघडा आहे. मुर्धा येथे जो सरळ रोड जातो डोंगरी पर्यंत तिथे सगळे बॉक्स उघडे आहेत. पिलर उघडे आहेत. बी.एस.ई.एस.चे मोठमोठे सबस्टेशन दरवाजे उघडे आहेत. जेणे तिथे जर एखादा माणूस गेला तर स्फोट हाऊन तो आग लागून माणूस मरेल. शॉक नाही लागणार? आपण लेखी पत्रही दिले आहे.

**मा. सभापती :-**

नागरीक लाईट चोरुन घेतात म्हणून तेच जबाबदार आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

येथे नागरिकांचा प्रश्नच येत नाही. ह्या मेन रोडला वखारीच्या बाजूला पिलर उघडे पडले आहे. त्याला कॉरुगेटड बॉक्स लावला आहे आणि तो ओला झाला आहे.

**मा. सभापती :-**

कुठल्याही कार्यक्रमाला ते लोक लाईट त्या पोलमधून घेतात.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, माझ्या वार्डमध्ये सबस्टेशन एवढे जुने आहे की, त्याचे दरवाजे तुटलेले आहेत. ते दरवाजे निखळे आहेत. त्यांना दहा वेळा सांगितले तेव्हा त्यांनी येऊन फक्त फळ्या मारल्या. त्या परत निघाल्या आणि सबस्टेशन उघड्यावरती आहे. उद्या जर का एखादा कोइन्सिडन्स झाला, लाईट, बत्त्या पोल पडतात. त्याचे बॉक्स असे खाली रस्त्यावर पडतात. हेव्ही केबल पाण्यामध्ये पडले आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, उत्तन, भातोडी बंदर आणि गल्लीत लाईट व शांतीनगर येथे स्ट्रीट लाईट हे ॲड करा.

**दिपक खांबित :-**

साहेब, प्रस्ताव पाठविलेला आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

बांधकाम विभागाने आतापर्यंत पोलची मागणी किती केली? त्यापैकी किती पोल लावले? ब्रॅकेट्स किती लावले? आणि किती गेलेले आहेत? आणि कुठे कुठे प्रस्ताव किती वर्षापासून केलेले आहेत? ही संपूर्ण माहिती सभेला घेऊन उपस्थित राहावे. कोणकोणत्या सभासदाने मागणी केली? त्याच्यासह आणि बी.एस.ई.एस.च्या अधिका-यांना पुढच्या सभेला ह्या विषयासह उपस्थित राहण्यासाठी आदेश द्यावेत असा सभापती महोदयांचा आदेश आहे.

**चंद्रकांत वैती :-**

प्रकरण क्र. २८ स्ट्रीट लाईट बसविण्याच्या प्रस्तावाला मंजूरी देणे. ह्या विषयात अनुक्रमांक १ ते २६ पर्यंत असलेले प्रस्ताव व सदस्यांनी सुविलेले इतर प्रस्ताव घेऊन सदर विषयाचा ठराव मांडण्यांत येत आहे.

**मोहन पाटील :-**

अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २८ :-**

स्ट्रीट लाईट बसविणे प्रस्तावांना मंजुरी देणे.

**ठराव क्र. ३५ :-**

| अ.क्र. | प्रस्तावांचे नांव |
|---|---|
| १. | भाईंदर (प) ९० फुटी रोड वरील रिद्धी अपार्टमेंट ते डॉन बॉस्को शाळे पर्यंत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २. | भाईंदर (प) अण्णानगर फकरी कॉलनी व ९० फुटी रोड वरील पद्मावती कॉम्पलेक्स येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ३. | भाईंदर (प) शंभुनाथ सोसायटी रेल्वे फुट ओव्हर ब्रीज येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ४. | भाईंदर (प) टेंभा हॉस्पीटल रोड येथील सालासर टॉवर जवळ स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ५. | कोंबडी गल्ली, स्टेशन रोड व राव तलाव येथे डबल ब्रॅकेट करणे. |
| ६. | भाईंदर (प) लाल बहादूर शास्त्री नगर येथे डबल ब्रॅकेट करणे. |
| ७. | भाईंदर (प) कै. बळीराम ठाकूर गल्ली अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ८. | भाईंदर (प) तारोडी, तलावली, पालखडी गांव अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ९. | भाईंदर (प) चौपाटी येथे डबल ब्रॅकेट करणे. |
| १०. | भाईंदर (प) राई शिवनेरी गांव अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| ११. | भाईंदर (प) मुबारक संकुल ते स्टेशन पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १२. | भाईंदर (पू) नवघर रोड वरील अमृत इंडस्ट्रीयल इंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १३. | भाईंदर (पू) आगर किरण अपार्टमेंट, ओ.एन.जी.सी. कॉलनी अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १४. | भाईंदर (प) तोडी निवास ते स्मशानभूमी पर्यंत स्ट्रीट लाईट लावणे. |
| १५. | घोडबंदर गांव अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १६. | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील मुन्शी कंपाउंड रामतीर्थ येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १७. | मिरा रोड (पूर्व) कनकिया पोलिस स्टेशन समोरील कॉसमॉस अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |

| अ.क्र. | प्रस्तावांचे नांव |
|---|---|
| १८. | मिरा रोड (पूर्व) सृष्टी ब्रिज येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| १९. | पेणकरपाडा अंतर्गत शंकर मंदिर नजीक स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २०. | भाईंदर (पूर्व) जय अंबे इंडस्ट्रीज अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २१. | भाईंदर (पूर्व) रत्न सिंधू व संजीवनी अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २२. | मिरारोड (पूर्व) सिल्व्हर पार्क जंक्सन ते जांगीड सर्कल ते शितल नगर पर्यंत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २३. | मिरारोड (पूर्व) शांतीनगर ते नया नगर पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २४. | भाईदर (पूर्व) स्नेहा हॉस्पीटल गल्ली अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २५. | भाईंदर (पूर्व) नर्मदा नगर अंतर्गत स्वाती अपार्टमेंट भारती दर्शन पर्यंत स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २६. | मिरारोड (पूर्व) साईबाबा नगर, पार्श्वनगर, व गोल्डन व्हॅली वेस्टर्न पार्क येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. |
| २७. | उत्तन भातोडी बंदर, धावगी, बिन्डूक गल्ली, चौक, पाली भागात स्ट्रीट लाईट बसविणे. |

वरील सर्व प्रस्तावांना मंजूरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २९ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, या ठिकाणी कारगीलच्या युद्धामध्ये सुधाकर भट्ट ह्यांना आरे सरिता जागा मंजूर करणेबाबतचा विषय आलेला आहे आणि ह्याच्यानंतर आपला एक विषय आहे की, ज्या टपऱ्या व अपंगांना बुथ द्यायचे आहे त्याच्यामध्ये आपल्याला संहिता निर्माण करायची आहे. तर हा विषय महत्वाचा आहे. परंतु आपल्याला जी संहिता तयार करायची आहे त्या संहितेला आधारभूत ठेवून हा विषय करावा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

पण आपण हा विषय आता पूर्ण करु या.

**मोहन पाटील :-**

हा संहितेला आधारभूत ठेवून विषय करावा.

**आसिफ शेख :-**

विषय पूर्ण करण्याअगोदर आपल्याकडे अनेक अर्ज आलेले आहेत. त्यामध्ये मागासवर्गीय व्यक्तिने अर्ज केलेला आहे. त्या अर्जाला पाच-सहा महिने झाले व मंगेश शिंदे म्हणून त्या व्यक्तिचे नांव आहे. तो प्रस्ताव आपल्याकडे आहे आणि तो प्रस्ताव ह्याच्यामध्ये यायला पाहिजे होता. पण मागासवर्गीय व्यक्तिकडे लक्षच दिले गेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय वीरगती प्राप्त झालेल्या माजी सैनिकांकरिता आहे. पण माझ्या माहितीनुसार महाराष्ट्र राज्य शासनाचे माजी सैनिक कल्याण केंद्र म्हणून एक विभाग आहे. त्याचे मंत्री श्री. दादा जाधवराव आहेत. त्यांच्याकडे ह्या संपूर्ण युद्धामध्ये, मग ते कारगील असो किंवा अन्य कुठलीही वॉर, अतिरेकी कारवाईमध्ये जे बळी पडतात जसे अहमदाबादला बळी पडले. ह्यांच्याकरिता स्टेट लेव्हलला सर्व स्टेटमध्ये वीरगती प्राप्त झालेल्या सैनिकांसाठी विशेष सवलत केंद्र असे राज्य शासनाने सुरु केलेले आहे. ह्या सैनिकांना त्या केंद्रामध्ये नोंदणी करायला लागते आणि त्यांच्याकडून त्यांना शासनाकडून मान्यता मिळते की, ह्या सैनिकांना ही ही मदत त्या स्वायत्त संस्थेने द्यावी अशी प्रोसिजर आहे. ह्या प्रस्तावाला माझा विरोध नाही.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, आपण आता जे सांगितले, नवघर रोडला द्यायचे आहे. तर तो मुख्य रस्ता आहे आणि मुख्य रस्त्यावरुन आपण टपऱ्या उचलणार आहोत आणि जे बॉक्स दिले आहेत तेही उचलणार आहोत आणि आता आपण ही जी परवानगी देत आहोत ती मुख्य रस्त्यावरच देत आहोत.

**मोहन पाटील :-**

सभापती साहेब, आपल्याला ह्या ज्या परवानग्या द्यायच्या आहेत तर आपला जो पुढचा विषय येतोय त्याला आधारभूत घरुन करा. संहितेला धरुन. ह्या विषयाला तुम्ही घाई करु नका.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

रोड आणि फुटपाथ सोडून वाहतुकीला अडथळे होणार नाही असे बघूनच दिले जाणार आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, तुम्ही असे स्पेशल विषय एकासाठी कसे आणता. भाईंदरमध्ये स्वातंत्र्य सेनानी भरपूर आहेत. मी तुम्हांला लिस्ट आणून देते, त्यांना देखील द्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ह्याचा निर्णय तुम्ही कसे घ्यायचे आहे ते घ्या.

**मोहन पाटील :-**

जे धारातीर्थी आणि हुतात्मा झालेले आहेत, देशाच्या बॉर्डरवर ते सर्व असू दे. कारगिल हा स्पेसीमेन शब्द होऊ शकत नाही. आपल्याला सर्वांना द्यायचे आहे. येथे आम्ही भांडतोय आणि ते तिथे आपली आहुती देतात. तर त्यांना दिले पाहिजे. त्याचा प्रश्नच येत नाही. म्हणून नियमाला जो विषय आपण दिलेला आहे. त्यांना ही नियमित करुन तुम्ही द्या. प्रश्न येतोच कुठे?

**मिलन म्हात्रे :-**

मी जो मुद्दा उपस्थित केला त्याच्यामध्ये मी ह्या विषयाला धरुन बोलतोय. मी जे सेवा केंद्राचे बोललो स्पेशल स्टेट गव्हर्नमेंटचे केंद्र आहे. सोसायटीच्या जागेत द्यायला काय हरकत आहे?

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, हा जो २९ चा विषय आहे. ती व्यक्ती माझ्या प्रभागामध्ये राहते. सुनिता कैलास पाटील नगरसेविका आहेत. त्यांचे शिफारस पत्र ह्यांना आलेले आहे. अधिकाऱ्यांनी पाहणी केली व कुठेही रोडवर जागा नाही आहे व ह्या लोकांची परिस्थिती देखील नाजूक आहे.

**शरद पाटील :-**

दुसऱ्यांच्या दुकानासमोर येईल.

**दिनेश नलावडे :-**

दुकानासमोर नाही आहे. अडचण बघण्यांत आलेली आही. तिथे तशी अडचण नाही.

**शरद पाटील :-**

आम्हांला त्याचा मॅप द्या.

**दिनेश नलावडे :-**

त्याची तुम्ही पाहणी करु शकता.

**मोहन पाटील :-**

कोणी देऊ नये असा विषय नाही.

**शरद पाटील :-**

आमचा कोणाचाही द्यायला विरोध नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य दिनेश नलावडेजी हा विषय देण्याचा नाहीच आहे. सिम्पथी जेवढी आपल्या सर्व भारतीयांना आहे ती सिम्पथी आपल्याप्रमाणे सगळ्यांना आहे आणि ती दिली पाहिजे. मी मघाशी या विषयावर बोलतांना बोललो, आपल्याला जी संहिता ठरवायची आहे तर ह्याच्यापुढे स्वातंत्र्य सेनानी आणि असे जे बरेच सैनिक आहेत त्यांचे प्रलंबित अर्ज आपल्याकडे आलेले आहेत. त्यांच्यासहित ह्यांना ही द्या. ह्यांना देऊ नका असे नाही तर ह्यांना दिले पाहिजे. ते मस्ट आहे. कारगीलचा मोठा विषय चालला आहे आणि आता तो वादग्रस्त झाला आहे.

**दिनेश नलावडे :-**

स्वातंत्र्य सैनिक जे आहेत व हे कारगीलचे ताजे उदाहरण आहे.

**शरद पाटील :-**

कसलाही कोणालाही त्रास न होता तिथे अशा जागेवर जागा द्यावी. तिथे कुठच्या दुकानदाराच्या कुठल्याही रस्त्याला अडथळा येत नसेल अशा ठिकाणी त्यांना देण्यांत यावे. आपण हा कम्बाईन विषय घ्या. सेपरेट असा विषय घेऊ नका.

**रिटा शाह :-**

सेपरेट विषय घेऊ नका. तुम्ही मागचा जो दुसरा विषय आहे त्याच्यामध्ये इन्क्लुड करा.

**शरद पाटील :-**

कम्बाईन विषय घ्या. सगळ्यांना एकच कायदा असू द्या.

**मा. सभापती :-**

जागेची पाहणी करुनच त्यांना मंजूरी देणार आहे.

**दिनेश नलावडे :-**

सदर विषयाच्या जागेची पाहणी करुन त्या व्यक्तीला बुथ देण्यास हरकत नसावी अशी मी ह्या ठिकाणी आपणला सुचना करीत आहे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेबांनी रुलिंग दिली की, जागा बघा. पण जागा बघयाचे नंतर येते. ह्या पुढचा विषय आहे. त्याच्यामध्ये ह्या विषयाला इन्क्लुड करुन जी संहिता ठरते त्या हिशोबाने ते बसत असेल तर त्याला द्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

बरोबर आहे. दोन्ही एकत्र घेऊ.

**दिनेश नलावडे :-**

ह्या कारगीलमध्ये आपल्याला अग्रक्रम द्यावा लागेल. आज पिच आहेत, चर्मकार समाजाचे बुथ आहेत, त्यांच्यापेक्षा अग्रक्रम आपल्याला कारगीलमध्ये हे आहेत त्यांना द्यावा लागेल.

**मोहन पाटील :-**

नाईक साहेब, हा विषय फुटपाथचा नाही किंवा दुकानाचा नाही आहे. आपल्याला जे रस्ते ठरवायचे आहेत व ज्या रस्त्यांवर मागच्या वेळी सचिव साहेबांना बोललो होतो की, जे ना-फेरीवाला झोन आपण ठरविलेले आहेत. त्याच्यामध्ये आपण दिलेले आहे की, कोणतीही टपरी, कोणतेही बुथ, कोणतेही काम आपण द्यायचे नाही. मग ते वेगळे होऊन जाईल. त्या ठिकाणी त्या रस्त्याला लागून जर जवळ अप्रोच रस्ता असेल ज्या रस्त्यावर बसवता येतील त्या रस्त्यावर बसवून त्यांना जागा मिळेल. आपल्याला रस्ते क्लिअर ठेवले पाहिजे. आपण एका बाजूने जर टपऱ्यांना परमिशन दिली, अपंग आहेत, स्वातंत्र्य सेनानी आहेत, कारगिल युद्धातले आहेत, अन्य कुठले असतील त्यांना आपण दिले पाहिजे. पण ते देतांना आपल्याला जी संहिता ठरवायची आहे त्या संहितेच्या आधारभूत आपण सगळे ठरवू असे मला बोलायचे आहे आणि जे मंजुरीचे प्रस्ताव आहेत. त्यांची संहिता ठरल्यावर पुढच्या सभेत एकत्र घेऊ या.

**रिटा शाह :-**

मला असे वाटते की, हे जे प्रस्ताव आहेत ते फक्त स्थायी समितीसमोर सादर करावे अशी माझी मागणी आहे.

**प्रकरण क्र. २९ :-**

कारगील युद्धात वीरगती प्राप्त झालेल्या सैनिकांची पत्नी श्रीम. प्रतिभा सुधाकर भट यांना ''आरे सरिता केंद्रासाठी'' जागा मंजूर करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ३६ :-**

या विषयाबाबत प्रशासनाने सादर केलेल्या टिपण्णीचे अवलोकन करण्यात आले. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकारचे स्टॉल्स (अंध, अपंग, गटई कामगार, टेलिफोन बुथ, आरे सरिता दुध केंद्र इ.) मंजूरीसाठी धोरण निश्चित करण्याचा प्रस्ताव प्रकरण क्र. ३० अन्वये मा. स्थायी समितीसमोर आहे. सबब प्रकरण क्र. ३० नुसार नियमावली मंजूर झाल्यानंतर उक्त मंजूर नियमावलीनुसार या प्रकरणात कार्यवाही करण्यात यावी. ठराव सर्वानुमते मंजूर.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. शरद के. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३० चे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

साहेब, आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये जे फेरीवाले आहेत, जसे भाजी, फळे विक्री करतात. त्यांचे आपल्याकडे फार प्रॉब्लेम आहे. कारण जे आपले स्थानिक लोक आहेत त्यांना न्याय मिळत नाही आणि बाहेरुन येऊन येथे बसून लोक दादागिरी करता असे प्रॉब्लेम माझ्याकडे आलेले आहेत. त्यासाठी आपण एक नितीनियम नक्की करुन त्यांना लायसन्स द्या. कारण मागच्या स्थायी समितीमध्ये हा विषय आलाही होता.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

हा विषय महासभेसमोर यायचा आहे आणि तो विषय झाल्यानंतर आपल्याला करता येईल.

**रिटा शाह :-**

कारण ह्याच्यामध्ये बाहेरच्या लोकांची दादागिरी जास्त आहे. आपल्या स्थानिक लोकांना ह्याच्यात काहीच मिळत नाही.

**आसिफ शेख :-**

सभापती महोदय, प्रकरण क्र. ३० या विषयाला अनुसरुन बोलतोय. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या वतीने दुध केंद्रासाठी जागा देणे, त्यानंतर अंध, अपंग व्यक्तिकरिता स्टॉल, टेलिफोन बुथकरिता जागा देणे, गटई कामगारांचे स्टॉल व पिच परवाने देणे. मला वाटते की, भूतकालीन नगरपरिषदेपासून आपण अशा व्यक्तींना न्याय दिलेला आहे आणि महाराष्ट्रात आपली पहिली तत्कालीन परिषद होती आणि आता महापालिका आहे की, आपण गटई कामगारांना आणि अंध अपंगांना आणि त्याचप्रमाणे आरे दुध केंद्र जास्तीत जास्त प्रमाणात त्यांना आपण मदत करतो. ही आपली महाराष्ट्रातील सर्वात पहिली अशी महानगरपालिका आहे. तत्कालीन नगरपरिषद ही होती आणि हा विषय खरोखरच आपले सहाय्यक संचालक, नगररचना विभाग श्री. शेंडे साहेब ह्यांच्यामार्फत आपणांकडे आलेला आहे आणि खरच त्यांनी एकदम चांगल्या पद्धतीने निती नियमावली तयार केलेली आहे. तर त्यामध्ये जी थोडीफार दुरुस्ती आहे ती मी ह्या ठिकाणी सुचवितो. पहिल्यांमध्ये दुध केंद्रामध्ये जागा देण्यासाठी अनुक्रमांक १ ते १६ पर्यंत मी नियमावली बनवलेली आहे. त्यामध्ये क्र. ४ यामध्ये म्हटले आहे की, सदर स्टॉलकरिता जागा गटार, फुटपाथ अथवा इतर ठिकाणी वाहतुक शाखेचा अभिप्राय देऊन देण्यांस हरकत नाही. तर त्या ठिकाणी आणखीन एक ओळ जोडण्यांत यावी की, तेथील स्थानिक नगरसेवकांचे शिफारसपत्र घेण्यांत यावे. तर ही ओळ आपण त्यामध्ये जोडून घ्या. जेणेकरुन, त्या परिसरातील स्थानिक नगरसेवकांना विचारात घेतले तर स्थानिक नगरसेवकाला कळणार आहे की, आपल्या परिसरामध्ये कोण, कुठे बुथ लावतो व त्यांचे शिफारसपत्र घेण्यांत यावे. सहामध्ये हस्तांतर फी जी आपण ठरवली आहे तीन हजार रुपये तर ते तीन हजार रुपये फी कमी करायला पाहिजे. कारण दुध केंद्रासाठी जागा चालवतात. तो एक प्रकारे सेवा उद्योग असतो म्हणून तीन हजारांऐवजी दोन हजार रुपये प्रस्तावित करावी अशी मी ह्या ठिकाणी सुचना करतो. ८ क्रमांकाची जी नियमावली आहे सन १९८५ म्हटले आहे की, ९५ म्हटले आहे.

**एस. आर. शेंडे :-**

८५ आहे.

**आसिफ शेख :-**

पण शासनाचा जो नियम आहे ९५ पुर्वीचा.

**एस. आर. शेंडे :-**

८५ पुर्वीचा किंवा पंधरा वर्षाचा.

**रिटा शाह :-**

पंधरा वर्षापासूनचा बरोबर आहे. पंधरा वर्षापासून येथे स्थानिक पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

८५ पुर्वीपासून निवडणूक यादीमध्ये नांव असेल तर.

**धनराज अग्रवाल :-**

यादीमध्ये नांव असेल तर.

**आसिफ शेख :-**

मतदार यादीमध्ये नांव असले पाहिजे.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण मतदार यादीचे सांगतात तर १९८५, १९८१ पासून राहणाऱ्या लोकांचे मतदार यादीत नाव नाही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, महापालिकेच्या सदनामध्ये असे नगरसेवक आहेत की, १९८५ साली त्यांचे स्वतःचे नांव मतदार यादीत नव्हते. ते काय ह्याला मंजुरी देणार. माझे जर त्यावेळेला नांव नव्हते तर मला अधिकार काय की, ह्या १९८५ साली नांव असले पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

जो मागेल त्याचे नाही पण त्याच्या आई-वडिलांचे नांव असेल की नाही.

**मोहन पाटील :-**

माझे ही नांव होते.

**मिलन म्हात्रे :-**

आपण हा मजेशीर विषय घेऊ नका.

**चंद्रकांत वैती :-**

मिलन म्हात्रे साहेब, हा मजेशीर नाही. ह्या विषयावर गेल्या दिड-दोन वर्षापासून अभ्यास चालू आहे आणि अतिशय अभ्यासूपणे हा विषय आणलेला आहे. त्याच्यामुळे आपण ह्याच्यात मजा घेण्याचे काहीच कारण नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी तेच बोलतोय, येथे वर वाहतुक शाखेचा परवाना तुम्ही मागताय. आपल्या डिपार्टमेंटतर्फे सात-आठ महिन्यापासून वाहतुक बेटाचे सर्व्हे झाले. आम्ही फिरलो. तो वाहतुक अधिकारी खैरनार नावाचा आहे आणि त्याने सगळे व्यवस्थित असूनसुद्धा आपले ठराव मंजूर झालेले असूनसुद्धा सर्व्हे केल्यानंतर चार-चार वेळा त्याच्यानंतर फिरल्यानंतर त्याने आपला अभिप्राय आणि एन.ओ.सी. दिली नव्हती. तुमच्या नगरपालिकेची आर.टी.ओ.कडे ती गत आहे, तर सामान्य, सर्वसामान्य नागरिकांची काय गत असेल. ह्यांना एक अट टाकायला हरकत नाही. त्यांनी एक रेघोटी ओढून टाकली. सिग्नल आहेत, ट्राफीक आहे, आयलॅन्डस् आहेत, स्पीड ब्रेकर आहेत ह्या सगळ्याला आर.टी.ओ.ने आठ महिन्यापासून आपल्याला अजूनपर्यंत एन.ओ.सी. दिली नव्हती. बांधकाम विभागाने त्याचा खुलासा करावा की, त्यांनी एन.ओ.सी. दिली नव्हती. आपले महापालिकेचे काम सगळ्यात व्यवस्थित व आता त्या ब्रीजवर एवढे ॲक्सीडंन्ड झाले. आर.टी.ओ.ला वाटले नाही की, आपण येतो, कॅम्प लावतो. मिरा भाईंदर शहरामध्ये आणि ती अट टाकली तर महापालिका त्याला किती करेल. साहेब, ह्या अटीवर त्यांना ही परमिशन मिळूच शकत नाही. आपल्याला जर आठ-आठ महिने लागतात तर एका सिंगल माणसाला किती महिने लागतील.

**मा. सभापती :-**

म्हात्रे साहेब, आपल्याला काय बघायचे आहे, तर तो इथला पंधरा वर्षापासून रहिवासी आहे किंवा नाही आणि आपल्या स्थानिक नगरसेवकांना सर्व जाणकारी असते.

**मिलन म्हात्रे :-**

माझे म्हणणे असे आहे की, आपल्याला नम्र विनंती आहे. जो वाहतुक शाखेचा क्लॉज आहे तो काढून आपण निर्णय घ्यावा, आयुक्त साहेबांनी निर्णय घ्यावा, उपआयुक्त साहेबांनी निर्णय घ्यावा.

**चंद्रकांत वैती :-**

उपआयुक्त साहेब, ह्याच्यामध्ये दोन ओळी अजून ॲड व्हायला पाहिजे होत्या.

**आसिफ शेख :-**

साहेब, म्हणून त्यामध्ये सुधारणा केली आहे किंवा म्हटले आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

यापुर्वी नगरपालिका असतांना गटई कामगारांना जे दिले होते त्याची प्रत्यक्षात विक्री होणे, भाड्याने देणे आणि ज्या कारणासाठी दिले होते त्या कारणा व्यतिरिक्त वापरतात म्हणजे समजा,

आपण गटई कामगारांना ज्या कामासाठी दिले होते, त्याऐवजी तिथे चहाचे दुकान सुरु झाले असे काढून टाकण्याबाबत आम्ही आदेश दिलेले आहेत. पंधरा दिवसात ते होईल व ज्यांनी विक्री केली असेल, भाड्याने दिले असेल किंवा मुंबईचा माणूस भाडे घेतो आणि येथे त्याचे स्टॉल आहे किंवा विक्री केलेले आहे किंवा ज्या गटई कामगारांना पोट भरुन घेऊ दे म्हणून आपण फुटपाथवर देखील त्यांना मान्य केलेले आहे. पण ते लोक दुसऱ्याला दिलेले आहे आणि तिथे चहा, थंडा, आईस्क्रीम विक्री चालू आहे. हे सगळे काढून टाकण्याबाबत व ज्या कारणासाठी दिले आहे ते तिथेच तोच व्यवसाय करत असतील तर ठेवू. परंतु, कारणा व्यतिरिक्त विक्री आणि भाड्याने दिले असेल ते काढून टाकण्यांत येईल.

**आसिफ शेख :-**

११ नंबरमध्ये आपण म्हटले आहे की, सदरचा स्टॉल विकता येणार नाही. भाड्याने देता येणार नाही. तसेच पुर्व सुचना न देता परवाना रद्द करण्यांत येईल असे म्हटले आहे. तर परवाना रद्द करुन फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करावी म्हणजे आपण म्हणतो फुत्कारो लेकिन काटो मत. म्हणजे कायद्याचा धाक बसला पाहिजे म्हणून फौजदारी स्वरुपाची कारवाई त्याच्यात ॲड करा.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, मला ह्याच्यात माहिती पाहिजे. आता जो विषय आला आहे तर ह्याला अर्ज आले आहेत. त्यांना देणार की, जे दुसरे बाकी आहेत त्यांना? आपण अर्ज करणारे आहेत त्याच्यात त्याच्यात देणार आहोत आणि आजपर्यंत आपल्याकडे किती टपऱ्या दिलेल्या आहेत. ह्याचा सर्व्हे आपल्याकडे आहे, त्याची माहिती आहे का?

**मा. सभापती :-**

अर्जदाराची परिस्थिती बघून आयुक्त साहेबांनी द्यावे अशी मी विनंती करतो. तो किती टक्के अंध, अपंग आहेत?

**आसिफ शेख :-**

त्यांच्यात दाखला असतो.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, ह्याचा विचारण्याचा हेतू असा आहे की, आजपर्यंत तुमच्याकडे जे बुथ आहेत त्यांची मोजमापणी झालेली आहे का? आता येथे किती बुथ आहेत? त्यांना लायसन्स आहेत का व ज्यांना लायसन्स दिलेले आहेत तेच बसतात का?

**मा. सभापती :-**

ह्याच्यावर उपआयुक्त साहेबांनी माहिती दिली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

अधुरी माहिती दिली. आपण त्यांना विचारा सर्व्हे झाला आहे का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आम्ही गटई कामगारांचा सर्व्हे केला आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मी नुसता गटई कामगारांचा सांगत नाही. तिन्ही आले, अपंग, दुध केंद्र आणि गटई कामगार ही आहे.

**मा. सभापती :-**

पुर्वी ग्रामपंचायती, नगरपालिकेपासून असलेल्यांचा आपल्याला आता विचार करता येत नाही. सध्या महानगरपालिकेचा विचार करायचा आहे आणि हा विषय आता आपली महानगरपालिका ठरवते ते करायचे, द्यायचे की नाही द्यायचे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, विचार करता येत नाही असे कसे?

**मा. सभापती :-**

जुने आहेत, त्यांना आपण काय करु शकतो?

**धनराज अग्रवाल :-**

जुने आहेत त्यांना काय करायचे आहेत तेच विचारतो.

**शरद पाटील :-**

उपायुक्त साहेब, एकेका व्यक्तीची तीन ते चार केंद्र आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

याबद्दल अहवाल तयार आहे. केळकर साहेबांच्या अध्यक्षतेखाली ती समिती बनली आहे. केळकर साहेब आपल्याकडे ह्याचा अहवाल आहे ना?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सोा.) :-**

कशाचा?

**चंद्रकांत वैती :-**

एकेका व्यक्तीचे तीन ते चार स्टॉल आहेत.

**मोहन पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये ना-अंकी क्षेत्र आहे. जे चार नंबर हा पुढच्या दुध केंद्राकरिता जागा देणेबाबत ह्याच्यामध्ये नाही आहे. तो देखील आपण ह्याच्यात घ्यावा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

अग्रवाल साहेबांचा जो मुद्दा आहे त्यामध्ये एस.टी.डी. बुथ आणि दुधाचे केंद्र ह्यांचे सर्व्हे करुन ते नियमित करणे शक्य असेल आणि तिच व्यक्ती योग्य असेल.

**मोहन पाटील :-**

आपल्या ह्याच्यामध्ये असेल ते. पण ह्याच्यामध्ये दिले आहे. दुध केंद्रासाठी ना-अंकित क्षेत्र जे आहे ते ह्याच्यामध्ये आले ते आपण घ्या आणि जे ४५ मीटर दिले आहे ते कॉमन आहे.

**शरद पाटील :-**

४५ अंतर हे कुठल्या व्यवसायासाठी पाहिजे. म्हणजे टेलिफोन बुथ आणि आरे सरिताचे असेल तर दोन्ही मिळून पाहिजे का, प्रत्येकाचे वेगवेगळे पाहिजे.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, ह्याचे इम्प्लिमेंन्टेशन होत असतांना जे आपले रुल्स, रेग्युलेशन पास झाले, जे आपण करत आहोत. पास झाल्यानंतर जे नियमांत बसत नाही आहे. नियमबाह्य जे जागेवर आहेत त्यांना काढून टाकणे जरुरी आहे आणि जसे ह्या ठिकाणी अग्रवालजींनी सांगितले जे आपल्या नियमात बसतील ते करुन द्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

येथे शब्द घातलेले आहेत की, गेली पाच वर्ष शासकीय व मान्यताप्राप्त दुध केंद्र आहेत त्यांना नियमित करता आले तर करायचे नाहीतर काढून टाकायचे.

**दिनेश नलावडे :-**

उपायुक्त साहेब, आज ज्यांच्याकडे लायसन्स आहे त्यांना आपण मुदत द्यावी. वर्षानुवर्ष ती जागा त्यांची परमनन्ट होईल असे करु नका. आपण नियमामध्ये तरतुद करुन ठेवा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

शेंडेजी, सगळ्यांकडून ॲग्रीमेंट करुन घ्यायचे.

**दिनेश नलावडे :-**

ज्यावेळेला त्यांची परिस्थिती चांगली होते त्यावेळी ते भाड्याने ते देतात आणि दुसरीकडे जातात व त्यांच्याकडे ती जागा परमनन्ट त्यांच्यासाठी राखून ठेवतात.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

ज्या वेळेला जागा देण्यांत येईल त्यावेळी करार करु.

**धनराज अग्रवाल :-**

जे गटई कामगार आता बसलेले आहेत ते सगळे गटारावर बसलेले आहेत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

यामध्ये ७५ टक्के जाणार आहेत म्हणून स्वतःहून विषय काढून सांगितले की, विक्री केली, भाड्याने दिले आणि ज्या कारणासाठी दिले आहे त्यासाठी त्याचा वापर होत नसेल तर ते सगळे काढण्याचे आदेश पंधरा दिवसांत काढून टाका म्हणून दिलेले आहेत.

**रिटा शाह :-**

नाईक साहेब, ह्यांची जी शंका आहे तर माझा एक प्रश्न आहे की, आता आपल्या शहरामध्ये ज्या टपऱ्या, टेलिफोन बुथ, अपंगांचे बुथ वगैरे आहेत त्यांना फ्रेश एन.ओ.सी. घ्यायची की नाही घ्यायची. मूळ प्रश्न असा आहे की, जे आता बसतात जसे कोण पंधरा वर्षापासून बसतो, कोण दहा वर्षापासून तर कोण एक वर्षापासून बसतो. त्या लोकांनी आता आपले जे नियम पास होणार त्या

अंतर्गत ते त्याच्यामध्ये बसत नसेल तर तुम्ही त्यांना काढणार की, नाही काढणार. त्यांना नविन एन.ओ.सी. काढावी लागेल का नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

नविन एन.ओ.सी. काढावी लागेल.

**रिटा शाह :-**

तेच मी विचारत आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

म्हणून हे शब्द टाकले, गेले पाच वर्ष जी नियमित करायची असेल जर नियमित करण्यासारखे असेल तर नियमित करुन द्या.

**रिटा शाह :-**

साहेब, ह्याचा अर्थ असा झाला की, आता मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये जो बुथ लागणार तो आजच्या ठरावानुसार लागेल.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

होय.

**अनंत पाटील :-**

सभापती महोदय, ग्रामपंचायत काळापासून काही लोकांचे आहेत व रिटा शाह मॅडमनी सुचना केली म्हणजे पुर्वीचे जे काही स्टॉल आहेत त्याला आतापर्यंत भुईभाडे किंवा त्यांच्याकडून आपण वसुली केली नाही असे जुने भाडे पंधरा-वीस वर्षापासून आहेत. तर त्यांना ते त्या ठिकाणी देऊ शकाल की नाही. त्यांनी तुमच्याकडे वेळोवेळी मागणी केलेली आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

रस्त्यावर असेल तर नाही.

**अनंत पाटील :-**

रस्त्याच्या बाजूला आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

बाजूला ओपन जागा आहे. तुम्ही जे भाड्याने दिले म्हणता ते आणि ती ओपन जागा आहे व पुर्वीची भाड्याची पावती आहे.

**अनंत पाटील :-**

तो विषय नाही. अन्य ठिकाणी काही लोक आहेत.

**रिटा शाह :-**

साहेब, माझी एक सुचना आहे. ह्या अंतर्गत महत्वाचा प्रश्न आहे की, आपल्याकडे ओव्हर ब्रिज बनले, जसे केबीन रोडवर ईस्ट-वेस्ट बनले आहे व त्याच्या खाली जी दुकाने झालेली आहेत तिथे केंद्र बनले आहे. त्याला मिरा भाईंदर महानगरपालिकेने त्याला परमीशन दिलेले आहे का? कारण अशी जी जागा आहे तर माझा बोलण्याचा अर्थ असा की, जे अपंग आहेत व जे कारगील युद्धामध्ये गेले अशा लोकांना तुम्ही अलॉट करा. कारण ती जागा आहे ती केव्हा अलॉट झाली व कुणाला दिली व मिरा भाईंदर महानगरपालिकेने त्याला कसे नो-ऑब्जेक्शन दिले ते कुणालाही काहीच माहिती नाही आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

असे दिले आहे का?

**रिटा शाह :-**

साहेब, मला माहित नाही असे बोलून चालणार नाही. आपण प्रशासकीय उत्तर द्या.

**मोहन पाटील :-**

मी माहिती देतो, ती जागा मधुमोहन जनसेवा समिती, भाईंदर पूर्व-पश्चिम ब्रिज खाली.

**रिटा शाह :-**

आपण उत्तर देण्यापेक्षा प्रशासकीय उत्तर येऊ दे.

**मोहन पाटील :-**

प्रशासन जवाब देईल पण मी क्लिअर सांगतो.

**शरद पाटील :-**

त्यांना माहिती आहे तर त्यांना माहिती देऊ द्या. हे सभापती होते त्यावेळेला दिलेले आहे म्हणून त्यांना माहिती आहे.

**मोहन पाटील :-**

त्याच्यामध्ये आपण महापालिकेचे आरोग्य केंद्र ही सुरु करतोय. महिलांचे स्वयंरोजगार सभाकेंद्र त्या ठिकाणी सुरु आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, दिले आहे त्याबद्दल आम्हांला खुशी आहे. ह्यांना दिले, कोणालाही दिले त्याबद्दल खुशी आहे. पण तुम्ही कुठल्या पद्धतीने त्यांना अलॉट केले त्याची माहिती आम्हांला द्या.

**मिलन म्हात्रे :-**

पंधरा मीटरची अट लावलेली आहे. ती येथे लावणार का? शहरामध्ये एकही रस्ता असा नाही हे लक्षात आपण घ्या. आपण त्यांच्याकडून पुढे फी घेतोय. त्यांना मेहेरबानी करतोय. आता ह्याच्यातून पुढे प्रसिद्धीपत्रक निघतील, बातम्या निघतील की, अंध, अपंगांवर महापालिकेने फार कृपा दृष्टी केली आहे. पण या शहरामध्ये मोठमोठ्या अनधिकृत इमारती उभ्या राहिल्या आहेत. रोड वायडिंगमध्ये ते आज आतमध्ये आहे व अजूनही बांधकामे चालू आहेत. त्यांना कुठलेही कंट्रोल नाही आहे, पंधरा मीटरचे. आज तुम्ही एक छोटी टपरी देणार त्याला तुम्ही दुनियेची उपविधी लावली आहे आणि आज अतिक्रमण भर रस्त्यामध्ये चालली आहेत त्यांना कोण थांबवणार?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कुठे चालली आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

चालली आहेत. चला ना आपण फिरु या. आज ज्या पंधरा मीटरची तुम्ही गोष्ट करता तर एकही प्रॅक्टीकली शक्य नाही. सगळी चर्चा वायफळ आहे. एकतरी मला रोड दाखवा. आता हा भाईंदर स्टेशन रोड आहे. ही जी संपूर्ण टपऱ्या बसणार आहेत. दुधाचे केंद्र जिथे मानवी वस्ती आहे, लोकवस्ती आहे तिथेच बसणार ना आणि कनाकिया वार्डामध्ये कशाल ते केंद्र चालणार. खाली तिथे पाईलीच्या पंधरा डेऱ्या आहेत. तर ते कशाला चालणार? लोकवस्ती आहे तिकडे आजच्या तारखेला म्हणजे ह्या शहराकरिता आपण इम्प्लिमेंट करतोय ही नियमावली. पण मला सांगा, भाईंदर वेस्टला एकतरी रोड पंधरा मीटरचा आहे का? नाही आहे. म्हणजे ही इम्प्लिमेंन्टेशन होणारच नाही आहे. वन वे, तर वन वे हे सगळे तुम्ही टाकून आभार प्रदर्शन कशाला करता? करुच नका.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

भाईंदर वेस्ट हा अठरा मीटरचा रोड आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नुसता एक रोड नाही, मीटरचा आहे पण प्रत्यक्षात आहे का? तर नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आहे. अठरा मीटरचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नाही. मी सांगतो तुम्हांला. चला मेजरमेंट करुया.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मेजरमेंट करा.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न हा नाही आहे साहेब. कुठेतरी एखाद्या रोडचे मेजरमेंट असणार. आज मी सांगतो तुम्ही पंधरा मीटरचे दिले आहे तर आपण प्रॅक्टीकलचा विचार करु. तुम्ही देणार आणि घेणारा जो उपभोक्ता आहे तो शहराच्या एका टोकाला कुठेतरी तुमच्या नियमानुसार लावणार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण म्हणता तर, हा जो ६० फिट रोड आहे अठरा मीटरचा आहे. वेस्ट रोड अठरा मीटरचा आहे. तुम्ही सांगता आम्ही कनाकियाला देऊ वेस्टच्या लोकांना.

**मिलन म्हात्रे :-**

तो आपोआप फेकला जाणार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

फेकला जाणार नाही. त्याचा सगळा विचार करुनच देणार.

**मिलन म्हात्रे :-**

सगळ्या सदस्यांनी ह्याच्यावर विचार केला पाहिजे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

म्हणजे परवानगी देणार बिनडोक आहेत असे तुमचे म्हणणे आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न बिनडोकचा नाही आणि मी तसा आरोप केलेला नाही आणि करणारही नाही. साधकबाधक शहराच्या विकासाकरिता.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

पंधरा मीटरची अट आम्ही टाकलेली आहे. त्याअर्थी ६० फुटी रोड आणि अठरा मीटरचा वेस्टचा रस्ता हा पंधरा मीटरच्या वरचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आणि मी तुम्हांला ह्याच्यापुढे जाऊन सांगतो. आमच्या वार्डमध्ये असे काही बरेचसे जागा आहे की, तिथे ते सरिता केंद्र चालू शकते. लोकवस्ती सुद्धा आहे. पण ते जुने जे इन्फ्रास्ट्रक्चर आहे त्याच्यात पंधरा मीटर नाही आहे. मग तिकडून तो वगळला गेला.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

अठरा मीटरचा रस्ता वेस्टला आणि ६० फिट रोडवर दिले तर दुधवाले स्वतःच्या वस्तीजवळ राहायला पाहिजे असे काही नाही. ६० फुटीवर येऊन घेतील किंवा वेस्टच्या रस्त्यावर येऊन घेतील. हे प्रत्येक गल्लीबोळात द्यायचे नाही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा नियम सगळ्या शहराला लागू होणार आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

प्रत्येक गल्लीबोळात द्यायचे नाही. अठरा मीटरचा रोड आहे आणि ६० फिटचा रोड आहे तिथेच मिळणार आहे. म्हणजे प्रत्येकाच्या घराशेजारी नाही मिळणार.

**मिलन म्हात्रे :-**

पण तुम्ही तिथे देणार की, पंधरा मीटरचा रोड नाही आणि तिथे टाकता येणार नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

प्रत्येकाच्या घराशेजारी गल्लीबोळात मिळणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

हे नियम, निकष सगळे तुम्ही लावणार.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

हो लावणार.

**मिलन म्हात्रे :-**

मग हे लावतांना सगळ्या समितीने विचार केला पाहिजे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

विचार करा.

**मिलन म्हात्रे :-**

हा प्रस्ताव तुमचा आलेला आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

विचार करण्यासाठी आम्ही तुमच्यासमोरच ठेवला आहे. मग तुम्ही म्हणा पाच मीटर ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या इथे बसलेल्या नगरसेवकाच्या एकाही वार्डमध्ये कुठेही पंधरा मीटरचा रोड नाही असे.

**चंद्रकांत वैती :-**

असे नाही, असे चुकीचे आहे. मिरा रोडमध्ये नया नगर, शांती नगर, सृष्टीमध्ये आहे. भाईंदर वेस्टला आहे. असे कितीतरी ठिकाणी पंधरा मीटरचा रस्ता आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा जो मेन रोडचा रस्ता आहे तो पंधरा मीटरचा आहे का? तुमचा पहिला विषय आटोपतोय ह्याच्यावरती. हा जो तुमचा पहिला विषय आहे स्वातंत्र्याचा ह्याच्यामध्ये कारगिलमध्ये मेलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकाला द्यायचे आहे. त्यांनी जो एरिया दाखविलेला आहे, रोड दाखविलेला आहे तो पंधरा मीटरचा आहे का?

**एस. आर. शेंडे :-**

आहे. अठरा मीटर रुंदीचा रस्ता आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आम्ही येथे जे बोलतोय ते रोड मोजून मापून बोलतोय. तुम्ही अवांतर भाष्य करु नका. तुम्हांला मोजणी करुन पाहिजे असेल तर संध्याकाळी चला.

**मिलन म्हात्रे :-**

आता चला.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सभा संपल्यानंतर जाऊ.

**चंद्रकांत वैती :-**

सभा संपल्यानंतर जा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ह्यांच्या पोटात दुखतेय आणि डॉक्टरांनी सांगितल्यावर नाहीच दुखत म्हणजे त्याचा अर्थ काय?

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपण बोलतोय ते इतके सोपे नाही आहे. ह्याच्यानंतर पुढे प्रत्येक नगरसेवकाला त्याचा त्रास होणार आहे हे लक्षात घ्या.

**चंद्रकांत वैती :-**

मिलन म्हात्रे साहेब, या शहरामध्ये ह्या अशा प्रकारे टपऱ्या लागून कुठेही शहराच्या सुंदरतेमध्ये उगीच जी नासाडी चालली आहे त्यासाठी हे नियम बनवले आहेत आणि खरोखर ते चांगले आहेत आणि असे आपण धरुन चालायचे का? जो उठेल तो आपली टपरी लावेल असे चालेल का? कुणाची आर्थिक कॅपेसिटी नाही का? आपण फक्त हे समाजाच्या ठराविक वर्गासाठी ठरवतोय आणि तुमच्या तसे केसेस असतील तर मी एकही शिफारस करणार नाही आणि आमच्या सगळ्या शिफारशी तुम्हांला देतो आणि तुम्ही सांगता शहरात कुठे पंधरा मीटर नाही तर यांना मिरा रोडला तुम्हांला सगळे रस्ते पंधरा मीटरचे दाखवतो.

**मिलन म्हात्रे :-**

नाही, मला नको आणि मी आमच्या एरियाचे बोलतोय, भाईंदर वेस्टचे.

**चंद्रकांत वैती :-**

या शहरामध्ये सुंदर आणि आज हा विषय झाल्यानंतर टपऱ्या द्यायचा विषय आहे तर आपण टपऱ्या कसल्या आपण विचार करतोय? आपल्या मनामध्ये इलेक्ट्रॉनिक रिपेरिंगच्या नाही तर चर्मकारांच्या टपऱ्या आहेत. टेलिफोन बुथ आहे आणि आरे सरिता ह्या तीनबद्दल आपण विचार करतोय. ह्याला नंतर या शहरामध्ये असलेल्या पानाच्या टपऱ्या आहेत किंवा इतर जी दुकाने रस्त्यावर आहेत त्या विषयांवर देखील आपल्याला जाता येईल. पण आज आपण कुठेतरी ही संहिता तयार केली पाहिजे आणि ती संहिता तयार करतांना तुम्ही एवढे कायदे सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

संहिता योग्य बनवा. त्यांनी कायदे सांगितले आहेत. आपण त्यांना कायदे नाही सांगितले.

**चंद्रकांत वैती :-**

बरोबर आहे, माझ्या मते ही संहिता ह्या शहरामध्ये पाहिजे. नाहीतर दहा दहा लाखाची दुकाने घेतात आणि त्यांच्या दुकानासमोर स्टॉल लागतो. त्याचे आपण काय करणार?

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, ह्याच्यावर मला तुमचा आता आदेश पाहिजे. मी म्हणतो तुम्ही पंधरा मीटर रस्त्याच्या गोष्टी करता तर आता तुम्ही चला आणि तुमच्या डायव्हर्शनवर पक्की दुकाने चालू आहेत ह्या सभेत ते तुम्ही तोडायचे आदेश द्या.

**मा. सभापती :-**

जिथे अठरा मीटर असेल तिथेच ते देणार ते दहा मीटरवर बसवायला देणार नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही आहे.

**मा. सभापती :-**

प्रश्न तोच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

एखाद्या गोरगरिब माणसाला टपरी देता. तेव्हा पंधरा मीटरचा नियम लागला जातो.

**मा. सभापती :-**

आपण हे अंध आणि अपंगांसाठी विषय आणला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अपंग आणि अंधांचे भले व्हावे म्हणून मी बोलतोय.

**मा. सभापती :-**

पण ह्याच्यावर किती बोलायचे?

**मिलन म्हात्रे :-**

आता हे जे कंन्स्ट्रक्शन टाकले आहे. येथे रस्त्यामध्ये तुमची ग्राऊंड प्लसच्या प्लॅनच्या बाहेर आजही दुकाने चालू आहेत. त्याच्याबद्दल बोला. रोडच्या डायव्हर्शनला टाकले आहे. कशाला तुम्ही अर्थाचा अनर्थ करता.

**मा. सभापती :-**

आपला आता विषय कुठला चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अतिक्रमण, ते अतिक्रमण.

**मा. सभापती :-**

अतिक्रमण. तर अतिक्रमणला तक्रार करा, ते उचलतील.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुम्हांला ते काढायला लागतील.

**याकुब कुरेशी :-**

उगाच विषयाचे विषयांतर करु नका. त्यांचे म्हणणे काय आहे ते ऐकून घ्या आणि नंतर काय ठरवायचे आहे ते ठरवा. उगाच कशाला सभेची वेळ वाया घालवता?

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, एक अर्ज माझ्याकडेही आला होता. मिरा रोडची शाळा बांधताना जसवंत माछी ह्यांनी स्वतःची तिथे जागा दिलेली आहे. तशा व्यक्तिंचा देखील ह्याच्यात विचार झाला पाहिजे आणि माझ्या हिशोबाने हा निर्णय धोरणात्मक आहे. हा विषय मा. महासभेत देखील गेला पाहिजे.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, हे जे अडीचशे मीटर अंतर ठेवले आहे ते कुठच्या टपऱ्यांमध्ये ठेवले आहे. म्हणजे आरे सरिता आहे, टेलिफोन बुथ आहे, हे एकत्र का वेगवेगळे अडीचशे मीटर?

**एस. आर. शेंडे :-**

तीन प्रकारचे स्टॉलचे विषय ठेवले आहेत. ह्याच्यात गटई कामगारांचा जो आहे, दोन गटई कामगारांचे स्टॉल राहतील त्याच्यातील अंतर अडीचशे मीटर.

**शरद पाटील :-**

आणि दुसरे टेलिफोन बुथ आहे त्याचे नाही.

**याकुब कुरेशी :-**

टेलिफोन बुथ, आरे सरिता सगळ्यांचे आहे.

**शरद पाटील :-**

म्हणजे सगळ्यांना अडीचशे मीटरचे अंतर आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

म्हणजे दुसऱ्यांचे बुथ, केंद्र बंद पडू नये आणि गटई कामगार लागून लागून असले तर गिऱ्हाईक मिळणार नाही.

**मोहन पाटील :-**

गटई कामगार, दुध केंद्र आणि टेलिफोन ह्यांचे अंतर किती राहिल? एका बाजूला गटई कामगार दिले आहेत, एका बाजूला टेलिफोन बुथ दिले आहे. तुम्ही असे ठरवून द्या की, अंदाजे १०० मीटरचा फरक तरी पाहिजे.

**शरद पाटील :-**

ह्याच्यात अडीचशे मीटर दिले आहे.

**मोहन पाटील :-**

गटई ते गटई अडीचशे दिले आहे आणि आपण जनरल शंभर एक मीटरचे लिहून द्या.

**शरद पाटील :-**

साधारण शंभर मीटरचे तरी अंतर पाहिजे.

**याकुब कुरेशी :-**

गटई कामगार, दुध सरिता आणि अपंग (टेलिफोन बुथ) हे तिघे एकत्र असतील तर चालु शकते. जागा तिथे असेल आणि एकत्र तीन स्टॉल तिथे आले. हे तीनही व्यवसाय एकत्र असे चालेल.

**चंद्रकांत वैती :-**

ह्यात दुरुस्त्या कराव्यात त्या अशा की, शहरातील जे प्रमुख रस्ते असतील जसे आता मिरा भाईंदरचा मुख्य रस्ता आहे. त्या रस्त्यावर अजिबात नको आणि शक्य तो फुटपाथवर अजिबात नकोत.

**शरद पाटील :-**

आणि दुकानदारांना त्रास नाही झाला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

हस्तांतरित फीमध्ये जे सांगितले आहे, दुध केंद्रासाठी हस्तांतरण फी दोन हजार रुपये अंध अपंगांसाठी ऐवजी पाचशे रुपये आणि गटई कामगांना पंधराशे ऐवजी हजार रुपये अशी दुरुस्तीसह मंजुरी देत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, आर.टी.ओ.चे काय केले आहे. आर.टी.ओ.ची परवानगी महापालिकेला दिली नाही. आठ महिने झाले. स्पीड ब्रेकर मधले जे सर्कल आहेत त्याला.

**याकुब कुरेशी :-**

ह्याच्यामध्ये दिलेले आहेत ते येणार नाही. बरोबर आहे. वाहतुकीचे परवाने वगळून हा ठराव मंजूर करावा.

**मिलन म्हात्रे :-**

निर्णय घेण्यासाठी आपली महापालिका सक्षम आहे.

**याकुब कुरेशी :-**

अपंग आणि अंध लोकांना ट्रॅफिकवाल्यांचे परवाने घेण्यासाठी जाऊ देऊ नका.

**आसिफ शेख :-**

त्या स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र घ्या.

**शरद पाटील :-**

तसा ठराव करुन घ्या.

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेखजींनी दुरुस्ती सुचविलेली आहे ती घ्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

प्रति चौरस फुटालासुद्धा पंधरा रुपये आहेत त्याच्यामुळे एक महिन्याला ३६० रुपये होतात. ते तुम्ही अडीचशे रुपये करावेत आणि डिपॉझिट पाच हजार रुपये आहे आणि वर्षाचे भाडे पाच हजार रुपये होते. ते दोन्ही सिमिलर ठेवले आहे. भाडे जे आपण पंधरा रुपये केले आहे ते दहा रुपये करावे.

**मा. सभापती :-**

भाडे दहा रुपये करण्यांत यावे.

**प्रकरण क्र. ३० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात - अंध, अपंग, गटई कामगार, टेलीफोन बुथ, आरे सरीता दुध केंद्रासाठी जागा मंजूर करणेसाठी, कार्यपद्धती निश्चित करणेबाबत.

**ठराव क्र. ३७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अंध / अपंग व्यक्तीना स्टॉल, गटई कामगारासाठी स्टॉल, पीच परवाने व शासकिय दुध केंद्र ( आरे सरीता इ.) टेलीफोन बुथ, इत्यादी जागा मिळणे बाबत नियमित अर्ज येत असतात. सदर अंध / अपंग, गटई कामगार व शासकिय दुध योजनेतील स्टॉलना जागा देणेबाबत शासनाचे धोरण आहे. प्राप्त अर्जदारांची स्टॉलसाठी जागेची मागणी बहुतांश रस्त्याचे गटार / पदपथावर असते.

वरील बाब लक्षात घेता व महानगरपालिकेची जागेची उपलब्धता पाहता स्टॉलना महानगरपालिकेचे गटार / पदपथावर व इतर ठिकाणी जागा उपलब्ध करुन देता येईल.

अंध / अपंग, गटई कामगार, टेलीफोन बुथ, इत्यादी कामासाठी स्टॉलना जागा देणे बाबत धोरण निश्चित होणे आवश्यक असून त्या अनुषंगाने स्टॉलना परवानगी देणेकामी नियमावली (धोरण) सोबत प्रस्तावित केली आहे, सदर नियमावली बाबत मा. स्थायी समितीच्या सदस्यांनी चर्चा करुन नियमावलीत दुरुस्ती सुचवलेली आहे. या दुरुस्तीनुसार ही नियमावली मंजूरीसाठी शिफारस मा.महासभेस करण्यास ही स्थायी समिती मंजूरी देत आहे.

**सोबतच्या अटीशर्ती खालील प्रमाणे.**

(अ) **दुध केंद्राकरीता जागा देणे.**

१) स्टॉल करीता जागा संबंधित शासकीय संस्थेस अथवा त्यानी मान्यता प्राप्त वितरकास देण्यात यावी. सदर संस्थेशी करारनामा करण्यात यावा.
२) ६' X ४' एवढ्या मोजमापाची जागा स्टॉल करीता देण्यात यावी.
३) रु.१०/- प्रती चौ.फुट प्रती महिना किंवा वेळोवेळी ठरविलेले भाडे, एवढे भुईभाडे आकारणयात यावे. तसेच अनामत रक्कम रु. ५,०००/- जमा करुन घेण्यात यावे.
४) सदर स्टॉलकरीता जागा गटार/फुटपाथ अथवा इतर ठिकाणी विद्यामान व भविष्यातील वाहतुकीचा विचार करुन देण्यास हरकत नाही.
५) दोन दुध केंद्रामधील कमीतकमी २५०.० मी. अंतर असावे.
६) परवान्याचे हस्तांतरण कायदेशीर वारसास हस्तांतरण फी आकारुन करण्यात यावे.
७) हस्तांतरण फी रु.२०००/- एवढी वारसा कडुन घेणेत यावी.
८) गेले ५ वर्षे जी शासकीय/मान्यताप्राप्त दुध केंद्र सुरु आहेत त्यांना नियमित करण्यात यावेत.
९) सन १९८५ अथवा त्यापुर्वीच्या मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ असल्याबाबत पुरावा अथावा मामलेदार कार्यालयातुन १५ वर्षापुर्वीचा रहीवाशी असल्याबाबत पुरावा सादर केल्यानंतर विचार करण्यात येईल.
१०)रस्त्यांची रुंदी १५ मी.अथवा त्यापेक्षा जास्त असावी. तसेच एकेरी वाहतुकीचे रस्ते अथवा नो हॉकर्स झोनचे रस्ते यावर परवानगी देण्यात येऊ नये.
११)ज्या व्यक्तीस परवाना दिलेला आहे, त्या व्यक्तीने व्यवसाय करावयाचा आहे. अन्य व्यक्ती आढळल्यास परवाना रद्द करणेत येईल.
१२)सदरचा स्टॉल विकता येणार नाही. अथवा भाड्याने देता येणार नाही. अन्यथा त्यासाठी पुर्व सुचना न देता परवाना रद्द करणेत येईल व त्यांचेवर फौजदारी कारवाई करण्यात येईल.
१३)ज्या ठिकाणी स्टॉल उभारणेस परवानगी दिलेली आहे त्याठिकाणीच स्टॉल उभारावा, अन्यथा दिलेली परवानगी पुर्व सुचना न देता परवानगी रद्द करण्याचे अधिकार महापालिकेच्या मा.आयुक्त् महोदयांनी राखुन ठेवलेला आहे.
१४)परवानगी प्रत्येक वेळी ११ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी राहणार नाही. मुदत संपल्यानंतर अर्जदाराची वागणुक व अटी व शर्तीच्या पालनाबाबत पडताळणी करुनच पुढील ११ महिन्यांच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येईल.
१५)४५ मी. रुंदीच्या छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावर कोणत्याही प्रकारच्या स्टॉलना परवानगी देण्यात येणार नाही.
१६)सदर परवाना देण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या परवाना विभागामार्फत करण्यात यावी. तसेच याबाबत तांत्रिक स्वरुपाची मदत आवश्यक असल्यास सबंधीत प्रभाग कार्यालयाकडील कनिष्ठ अभियंता यांचेकडून परवाना विभागाने घ्यावी.
१७)अर्जदार जरी वरील सर्व अटींची पूर्तता करीत असला तरी रस्त्यावरील भविष्यातील रहदारी तसेच स्थानिक परिस्थितीचा विचार करुन नविन स्टॉल / विद्यमान स्टॉलचे नूतनिकरण मंजूर करण्याचे अथवा नाही हे ठरविण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहतील.

### (ब) **अंध अपंग व्यक्ती करीता स्टॉल (टेलिफोन बुथ) करीता जागा देणे बाबत.**

१) अंध/अपंग व्यक्तीकरीता जागा स्टॉलकरीता जागा संबधीत शासकीय मान्यताप्राप्त संस्थेस अथवा त्याचे मान्यता प्राप्त व्यक्तिस देण्यात यावा. सदर संस्थेसोबत / व्यक्तिसोबत करारनामा करण्यात यावा.
२) ४' X ४' एवढ्या मोजमापाची जागा स्टॉलकरीता देण्यात यावी.
३) अस्तित्वातील अधिकृत स्टॉल तपासणी करुन सदर नियमानुरुप असतील तरच नियमित करणेत यावे.अन्यथा त्याची परवानगी रद्द करणेत यावे.
४) ज्या रस्त्यांवर **ना अंकीत क्षेत्र** (एकेरी वाहतूकिचे रस्ते अथवा नो हॉकर झोनच्या रस्त्यावर) आहे अशा रस्त्यावर नविन स्टॉलकरीता जागा देण्यात येऊ नये.
५) सदर स्टॉलकरीता जागा गटार/फुटपाथ अथवा इतर ठिकाणी विद्यामान व भविष्यातील वाहतुकीचा विचार करुन देण्यास हरकत नाही.
६) दोन स्टॉल मध्ये कमीत कमी २५०.०० मी. अंतर असावे.
७) रु.१०.०० प्रति चौ.फुट प्रति महीना किंवा वेळोवेळी ठरविलेल्या भाडे एवढे भुईभाडे आकारण्यात यावे. तसेच अनामत रक्कम रु. ३,०००/- जमा करुन घेण्यात यावे.
८) सदर स्टॉल करीता जागा देताना वाहतुक शाखेचा अभिप्राय घेणेत यावा.
९) परवान्याचे हस्तांतरण अंध/अपंग व्यक्तीवर अवलंबुन असणा-या कायदेशीर वारसास हस्तांतरण फी आकारुन करण्यात यावे.
१०) हस्तांतरण फी २,०००/- एवढी वारसाकडुन घेणेत यावी.
११) सन १९८५ अथवा त्यापुर्वीच्या मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ असल्याबाबतचा पुरावा अथवा मामलेदार कार्यालयातील १५ वर्षापुर्वीचा रहीवासी असल्याबाबत पुरावा सादर केल्यानंतरच विचार केला जाईल.
१२) रस्त्याची रुंदी १५ मीटर अथवा त्यापेक्षा जास्त रुंद असावा.
१३) ज्या व्यक्तीस परवाना दिला आहे. त्या व्यक्तीला व्यवसाय करावयाचा आहे. अन्य व्यक्ती आढळल्यास परवाना रद्द करण्यात येईल.
१४) सदरचा स्टॉल विकता येणार नाही. अथवा भाड्याने देता येणार नाही. अन्यथा त्यासाठी पुर्व सुचना न देता परवानगी रद्द करण्यात येईल व त्यांचेवर फौजदारी कारवाई करण्यात येईल.
१५) ज्या ठिकाणी स्टॉल उभारणेस परवानगी दिलेली आहे त्याच ठिकाणी स्टॉल उभारणेत यावा. अन्यथा दिलेली परवानगी पुर्व सुचना न देता परवानगी रद्द करणेचा अधिकार महापालिका आयुक्तांनी राखुन ठेवला आहे.
१६) परवानगी प्रत्येक वेळी ११ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी राहणार नाही. मुदत संपल्यानंतर अर्जदाराची वागणुक व अटी/शर्तीचे पालनाबाबत पडताळणी करुनच पुढील अकरा महिन्यांची मुदतवाढ देता येईल.
१७) ४५ मी. रुंदीच्या छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावर कोणत्याही प्रकारच्या स्टॉलना परवानगी देण्यात येणार नाही.
१८) सदर परवाना देण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या परवाना विभागामार्फत करण्यात यावी. तसेच याबाबत तांत्रिक स्वरुपाची मदत आवश्यक असल्यास सबंधीत प्रभाग कार्यालयाकडील कनिष्ठ अभियंता यांचेकडून परवाना विभागाने घ्यावी.
१९) अर्जदार जरी वरील सर्व अटींची पूर्तता करीत असला तरी रस्त्यावरील भविष्यातील रहदारी तसेच स्थानिक परिस्थितीचा विचार करुन नविन स्टॉल / विद्यमान स्टॉलचे नूतनिकरण मंजूर करण्याचे अथवा नाही हे ठरविण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहतील.

## गटई कामगारांचे स्टॉल/पीच परवाने

गटई कामगारांना पीच (जागा) परवाना देणेबाबत.

१) अर्जदार चर्मकार समाजाचा व जातीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
२) जागेचे क्षेत्रफळ ४' X ३' एवढे असावे.
३) दोन जागामध्ये कमीत कमी अंतर २५०.० मिटर असावे.
४) अस्तित्वातील अधिकृत परवाना धारक बाबत छाननी करुन योग्य तो निर्णय घ्यावा.

५) सदर स्टॉलकरीता जागा गटार/फुटपाथ अथवा इतर ठिकाणी विद्यमान व भविष्यातील वाहतुकीचा विचार करुन देण्यास हरकत नाही.
६) ज्या रस्त्यांवर **ना अंकीत क्षेत्र** (एकेरी वाहतूकिचे रस्ते अथवा नो हॉकर झोनच्या रस्त्यावर) आहे, अशा रस्त्यांवर नविन स्टॉलकरीता जागा देणेत येऊ नये.
७) रु.१०/- प्रति चौ.फुट. प्रतिमहिना एवढी परवाना फी आकारण्यात यावी. तसेच रु. १,०००/- अनामत रक्कम जमा करुन घेण्यात यावी.
८) सदर स्टॉल करीता जागा देताना वाहतुक शाखेचा अभिप्राय घेणेत यावा.
९) विधी विभागाकडुन अभिप्राय घेऊन परवानाचे हस्तांतरण कायदेशीर वारसास हस्तांतरण फी आकारुन करण्यात येईल.
१०)हस्तांतर फी रु.१०००/- एवढी वारसा कडुन घेण्यात यावी.
११)ज्या व्यक्तीस परवाना दिलेला आहे. त्या व्यक्तीला व्यवसाय करावयाचा आहे. अन्य व्यक्ती आढळल्यास परवाना रद्द करण्यात येईल.
१२)सदरचा स्टॉल विकता येणार नाही अथवा भाड्याने देता येणार नाही. अन्यथा त्यासाठी पुर्व सुचना न देता परवानगी रद्द करण्यात येईल व त्यांचेवर फौजदारी कारवाई करण्यात येईल.
१३)ज्या ठिकाणी स्टॉल उभारण्यास परवानगी दिलेली आहे. त्याच ठिकाणी स्टॉल उभारण्यात यावा. अन्यथा दिलेली परवानगी पुर्व सुचना न देता परवानगी रद्द करणेचा अधिकार महापालिकेच्या आयुक्तांनी राखुन ठेवला आहे.
१४)परवानगी प्रत्येक वेळी ११ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी राहणार नाही. मुदत संपल्यानंतर अर्जदाराची वागणुक व अटी/शर्तींचा पालनाबाबत पडताळणी करुनच ११ महिन्यांची मुदतवाढ देण्यात येईल.
१५)४५ मी. रुंदीच्या छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावर कोणत्याही प्रकारच्या स्टॉलना परवानगी देण्यात येणार नाही.
१६)सदर परवाना देण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या परवाना विभागामार्फत करण्यात यावी. तसेच याबाबत तांत्रिक स्वरुपाची मदत आवश्यक असल्यास सबंधीत प्रभाग कार्यालयाकडील कनिष्ठ अभियंता यांचेकडून परवाना विभागाने घ्यावी.
१७)अर्जदार जरी वरील सर्व अटींची पूर्तता करीत असला तरी रस्त्यावरील भविष्यातील रहदारी तसेच स्थानिक परिस्थितीचा विचार करुन नविन स्टॉल / विद्यमान स्टॉलचे नूतनिकरण मंजूर करण्याचे अथवा नाही हे ठरविण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहतील.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३१ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

मंजूर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपण हा विषय मताला टाका. आम्ही ह्याच्या विरोधात मतदान करणार आहोत. तुम्हांला मंजूर करायचे तर मंजूर करा. आपण हा विषय मताला टाका. आम्हांला ह्याच्यावर मतदान घ्यायचे आहे. मला ह्याच्यामध्ये अपिलात जायचे आहे, मंत्रालयामध्ये. आपण हा विषय मताला टाका. मंजूर कसे बोलता?

**मोहन पाटील :-**

मंजूर आहे म्हणून बोललो. ठराव मंजूर आहे असे बोललो का?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मंजूर बोलू शकत नाही.

**मोहन पाटील :-**

बरोबर, नाही बोलू शकत. पण आपण बोला.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही बोललात कशाला? तुम्ही तुमचे हे वक्तव्य मागे घ्या.

**मोहन पाटील :-**

ठराव मंजूर कुठे बोललो मी?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सभापती महोदय, प्रत्येक नागरिकाला, सदस्यांना कुठे जायचा हा हक्क आहे. येथे बोलण्याचा प्रश्न येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी मंजूर बोलल्यावर मी बोललो आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

पण तो विषय मंजूर झाला कुठे?

**मिलन म्हात्रे :-**

मंजूर आहे असे त्यांना बोलण्याचा अधिकार नाही आहे. विषय सभापती साहेबांच्या अखत्यारितला आहे. नाही तो विषय मी कसे काय बोलणार?

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण ३१ वर जो गोषवारा दिलेला आहे त्यामध्ये एक वाक्य असे दिले की, दोन्ही वेळेला प्राप्त निविदा नामंजूर करण्यात आले त्याचे कारण काय? कोणत्या कारणासाठी त्या दोन्ही वेळेला त्या निविदा नामंजूर झाल्या? दोघांची नांवे द्या.

**संजय दोंदे :-**

गॅरेज उपलब्ध नव्हते.

**मिलन म्हात्रे :-**

आता दिलेले आहे त्यांचे गॅरेजेस उपलब्ध आहे?

**संजय दोंदे :-**

आता दिलेले आहे त्याचे गॅरेजेस उपलब्ध आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण आम्हांला याबाबत लेखी द्याल का? सभापती साहेब, ह्या भाईंदर शहरामध्ये या येथे बसलेल्या सगळ्या लोकांच्या गाड्या आहेत. भाईंदर शहरामध्ये एकतरी गॅरेज दाखवा की, त्याचे स्वतःचे सर्व्हिस स्टेशन आहे. फक्त पेट्रोल पंप वगळता कोणाकडेही सर्व्हिस स्टेशन नाही.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, मला एक प्रश्न विचारायचा आहे. मागे जो टेंडर तुम्ही कॅन्सल केले, रिजेक्ट झाले तेच टेंडरवाले आता परत आहेत का?

**संजय दोंदे :-**

त्यातले दोन तेच आहेत.

**रिटा शाह :-**

आता तुम्ही टेंडर ज्यांना देणार आहात ती तीच लोक आहेत का?

**संजय दोंदे :-**

होय तीच आहेत.

**रिटा शाह :-**

मग त्यांनी आता गॅरेज कुठे टाकले आहे.

**संजय दोंदे :-**

ॲड्रेस दिलेला आहे. उत्तन रोडला.

**रिटा शाह :-**

उत्तन रोडला कुठे? त्याला काहीतरी ॲड्रेस असेल ना?

**मोहन पाटील :-**

आपण बघितले का?

**संजय दोंदे :-**

होय, बघितले आहे.

**रिटा शाह :-**

आपण असे मध्ये कसे बोलता? तुम्ही ॲड्रेस सांगा, ते गॅरेज कुठे आहे?

**संजय दोंदे :-**

राई गावात.

**रिटा शाह :-**

राई गांव एवढे मोठे आहे. तो स्पॉट कुठे आहे?

**मिलन म्हात्रे :-**

गॅरेजचे नांव काय आहे?

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती साहेब, राईला बस स्टॉपच्या डाव्या हाताला जे गॅरेज आहे. त्या गॅरेजची अवस्था बघा. आपण तेथून नेहमी पार होता. मी सुद्धा तेथूनच जातो. आपण जर त्या गॅरेजची अवस्था बघितली तर त्या गॅरेजच्या अवस्थेवरुन वाटते का, ही सगळी कामे तिथे केली जातील? फक्त बारा डब्बा रिक्षा आणि ज्या थ्री व्हीलर रिक्षा आहेत त्याची कामे तिथे केली जातील. कॉन्टेसा, फोर्न्ड ह्यांची सर्व्हिस तिथे केली जाईल?

**चंद्रकांत वैती :-**

महानगरपालिका वाहनांसाठी स्पेअर पार्ट पुरवठा करुन दुरुस्ती करणे, त्याकामी वार्षिक निविदांना मंजुरी देणे. गेल्या कित्येक महिन्यांपासून आपण हा त्रास सहन करतोय की, गाड्यांची दुरुस्ती होत नाही, गाड्यांचे स्पेअर पार्टस् नाही. सदर बाबतच्या निविदा आलेल्या आहेत. त्याच्यात कमीत कमी दराची जी निविदा आहे त्या निविदेला मंजुरी देण्यांत यावी असा मी ठराव मांडत आहे.

**चंद्रकांत वैती :-**

या ठरावाला आमचा विरोध आहे. आपण ह्या ठरावावर मतदान घ्यावे.

**दिनेश नलावडे :-**

सदर ठरावास मंजुरी दिलेली आहे. त्याला मी अनुमोदन देत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आपल्या गाड्या आपल्या येथे आहेत की, बाहेर गेलेल्या आहेत. मागे देखील कलेक्टरकडे आणि येथे तेथे आपल्या गाड्या जात होत्या. आता सगळ्या गाड्या येथेच आहेत का?

**मोहन पाटील :-**

या ठरावावर अनुमोदन दिले का?

**रिटा शाह :-**

होय.

**मिलन म्हात्रे :-**

मतदान करा. अनुमोदन कसे करता. या ठरावाला आमचा विरोध आहे. या ठरावावर डिक्लर करा, कोण या ठरावाच्या बाजूने आहेत आणि कोण विरोधात आहेत. त्याचे काऊंटींग झाले पाहिजे. माझे स्वतःचे मत आहे. आपण ह्यांचेही मत विचारा. ह्याच्यावर आम्हांला सहमती द्यायची नाही.

**धनराज अग्रवाल :-**

कशाला येथे गाड्या आणायच्या? जर गाड्या आपले ऑफीसर वापरत नाहीत, दुसरेच लोक वापरतात आणि परत देतच नाहीत. आपली महापालिका एवढी श्रीमंत आहे का, आपल्या गाड्या दुस-याला देण्याकरिता?

**मा. सभापती :-**

आपल्या गाड्या आपले ऑफीसर वापरतात.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, आपण माहिती द्या की, किती गाड्या बाहेर गेलेल्या आहेत? किती दिवसापासून बाहेर गेलेल्या आहेत? आपण गाडी विकत घ्यायचे आणि लोकांना द्यायचे असे झाले आहे.

**संजय दोंदे :-**

गाड्या परत आल्या आहेत. पण त्यांनी पुन्हा पाच गाड्यांचे पत्र आलेले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, आपल्या गाड्या सचिवालयामध्ये जातात.

**मा. सभापती :-**

आपण गाड्या भाड्याने आणायचे आणि त्यांना आपल्या गाड्या द्यायच्या हे बरोबर नाही.

**मिलन म्हात्रे :-**

जिल्हाधिका-यांकडे किती गाड्या कायमस्वरुपी आहेत आणि आपण त्या का ठेवायच्या?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सोा.) :-**

जिल्हाधिका-यांकडे आपल्या दोन गाड्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

कशासाठी आहेत? काय कारण आहे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सोा.) :-**

त्याचबरोबर ह्याबाबत अनेक वेळा आपली चर्चा झालेली आहे आणि अशा त-हेचे पत्रही आपण जिल्हाधिकारी ह्यांना दिले होते. पण जिल्हाधिका-यांनी अद्याप ती गाडी परत पाठवलेली नाही. त्याचबरोबर एक गाडी मा. राज्यमंत्री महोदयांकडे आहे. त्यांनी मागितल्याप्रमाणे ती एक राज्यमंत्री महोदयांना देण्यांत आली. अशा तीन गाड्या बाहेर आहेत आणि आज पुन्हा ऑर्डर आलेली आहे, पाच गाड्या निवडणूक कामांकरिता जिल्हाधिकारी महोदयांनी मागितल्या आणि ते रिफ्युजेशन आदेश असल्यामुळे त्या आदेशाचे पालन करणे हे आयुक्तांना बंधनकारक आहे.

**दिनेश नलावडे :-**

उपायुक्त साहेब, आपल्याकडे पाच गाड्या मागितलेल्या आहेत, असे प्रत्येक ठिकाणी त्या लोकांचे आदेश असतील. केळकर साहेब, इतर नगरपालिकेकडे, महानगरपालिकेकडे किती गाड्या मागितल्या आहेत. त्या पद्धतीने आपल्या महापालिकेकडून गाड्या मागवल्या पाहिजे. दुसरीकडे मागवणार नाहीत, फक्त आपल्या गाड्या मागवित असतील तर मंजुरी देऊ नका. त्यांनी दुस-या महापालिकेला आदेश दिले असतील ते आपण चेक करा.

**याकुब कुरेशी :-**

सभापती साहेब, सदर विषयाबाबत जी टिपणी दिलेली आहे त्याचे अक्षर दिसत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, हा जो ठराव मंजुर झाला आहे. ठरावाच्या पाठची दोन पाने मी तुम्हांला वाचून दाखवितो. ह्यांना अनुमोदन करायला घाई झाली. ट्रॅक्टरला बंपर लावले आहे. जसे कारला बंपर येतो तसे ट्रॅक्टरला बंपर लावले आहे. ४९२ ला वेल्वेटची सिटस् दिलेल्या आहेत त्याच्यानंतर ट्रॅक्टरकरिता साईडची कव्हर आणि ट्रॅक्टरला दरवाजे कधीपासून लागायला लागले ते आपण सांगावे. ट्रॅक्टरकरिता ड्रायव्हर सीट येत नाही. त्याला फ्लोरिंग कुठे येते? ह्या ज्या सर्व सीटस् आहेत. त्याची जी रक्कम आहे त्याच्यामध्ये पाच हजार पन्नास गेल्या वर्षाचे आणि ह्याच्यामध्ये.

**याकुब कुरेशी :-**

आम्हांला येथे जो गोषवारा दिलेला आहे त्याच्यामध्ये स्पेअर पार्टस्चे नांव स्पष्ट दिसत नाही. त्यामुळे आपण हा विषय पुढच्या सभेत आणावा.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्याकडे ते पान व्यवस्थित आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मिलन म्हात्रे साहेब, आपण कुठल्या पानावर ट्रॅक्टरला दरवाजे लिहिले आहेत ते दाखवा.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, ह्या ठरावाला माझे ऑब्जेक्शन आहे.

**चंद्रकांत वैती :-**

दरवाजे कुठल्या पानावर आहेत ते दाखवा.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याला हा जो गोषवारा दिल आहे त्याच्यामध्ये शेवटचे पान क्र. ६७(२) नंबरला आहे, डोअर कव्हर १,४५० आणि येथे खाली लिहिले महिंद्रा ५७५.

**मोहन पाटील :-**

आम्हांला ते स्पष्ट दिसत नाही. वाचता येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मला वाचता येते.

**चंद्रकांत वैती :-**

हे जीपचे लिहिले आहे, ५७५.

**आसिफ शेख :-**

येथे खाली लिहिले आहे. जीप म्हटलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते जे लिहिले आहे ते मला दाखवा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

जीप म्हटले आहे. ते ट्रॅक्टर नाही आहे आणि ट्रॅक्टरला डोअर कव्हरचा प्रश्नच येत नाही.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य याकुब कुरेशीजी बोलले आहेत की, गोषवारा जो दिलेला आहे तो स्पष्ट नाही. हा विषय पुढच्या सभेत घ्यावा. तर आपण येथे त्याच्यावर चर्चा करुन फायदा काय आहे? सभापती साहेब, हा विषय संपुष्टात आणा. हा विषय पुढे आपल्यासमोर चर्चेकरिता येणारच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याला म्हणायला एकदम सोपे आहे की, हा विषय मंजूर केलेला आहे.

**दिनेश नलावडे :-**

ठिक आहे. पण त्याच्यानंतर तो विषय पुढच्या सभेत घेण्याकरिता सुचना आल्या व त्याला मान्यता देतातो पुढे विषय घेण्याकरिता.

**मिलन म्हात्रे :-**

जो क्रँक शिफ्ट आहे त्याच्यातसुद्धा डबल तफावत आहे. पाच हजार पाचशे पन्नास आणि ह्याच्यामध्ये आपण आता दिलेला रेट साडे दहा हजाराचा.

**हॅरल बोर्जीस :-**

त्यांनी ओरिजनल घेतले असेल.

**मिलन म्हात्रे :-**

मग हा ड्युप्लीकेट बसवला होता का? असे आपण गृहित धरु या. पाच हजार पन्नासचा आहे आणि ह्याच्यामध्ये दहा हजाराचा रेट आहे. गेल्या वर्षाची खरेदी आहे. नगरपालिकेचा ठराव आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य याकुब कुरेशीजी म्हणाले टिपणी त्यांना व्यवस्थित दिसत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

आपण हा विषय पुढच्या सभेत ठेवा.

**मा. सभापती :-**

म्हणजे टेंडर पुन्हा रिकॉल करायचे का?

**आसिफ शेख :-**

टेंडर रिकॉलचे बोलत नाही.

**याकुब कुरेशी :-**

ही टिपणी व्यवस्थित देण्यांत यावी असे माझे म्हणणे आहे.

**आसिफ शेख :-**

विषय मंजूर करायचे आहे पण त्याला पुढच्य सभेत मंजुरी देऊ या असे. कारण टिपणी स्पष्ट पाहिजे.

**दिनेश नलावडे :-**

टिपणी बरोबर द्या. झेरॉक्स बरोबर द्या अशी सर्व सदस्यांची मागणी आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर होत नाही म्हणून त्या गाड्या रिपेअर होत नाही व त्या गाड्या बाहेर पडलेले आहेत नाहीतर आपण कधीच त्या गाड्या गॅरेजला पाठवले असते. आठ महिने झाले हा विषय मंजूर होत नाही.

**याकुब कुरेशी :-**

सभापती साहेब, दोन, तीन, सहा-सहा महिने झाले आहेत. त्या गाड्या बंद पडलेल्या आहेत आणि आठ दिवसामध्ये काही फरक पडत नाही. आपण ही जी टिपणी आहे ती व्यवस्थित द्या. आपण लाखो रुपयांची मंजुरी देतोय आणि स्पेअर पार्टस्‌ची स्पष्ट नांवे सुद्धा दिसत नाही. तर तुम्ही ह्याला काय मंजूरी देणार आणि आम्ही काय मंजूरी देणार.

**मा. सभापती :-**

ह्या वर्षाच्या पाच सहा लाखाला तुम्ही एवढे भांडता. मला समजत नाही, वर्षाला कितीचे असते?

**याकुब कुरेशी :-**

साहेब, प्रश्न खर्चाचा नाही तर प्रश्न ठराव पास करण्याचा आहे.

**मा. सभापती :-**

किती लाखानी उलाढाल होते ते बघत नाही आणि येथे पाच-सहा लाखाच्या वर्षाच्या खर्चाला मंजूरी देत नाही. येथे आरोग्याच्या ॲम्ब्युलन्स बंद पडल्या आहेत त्यांना रिपेअर करायला पैसे पाहिजे आहेत.

**याकुब कुरेशी :-**

स्पेअर पार्ट कुठले आहेत आणि काय आहे त्याचे नांव तरी वाचायला यायला पाहिजे. माझे म्हणणे एवढेच आहे की, ही जी टिपणी दिली आहे ती टिपणी आपल्या अधिका-यांनी बघितली आहे का? ते अशी टिपणी कशाला देतात हे आपण मला सांगा.

**मा. सभापती :-**

दोंदे साहेब, पुढच्या स्थायी समितीला टिपणी रितसर आणि वाचता येईल असे सन्मा. सदस्यांना टिपणी द्यावी व हे वाहन विभागाचे दोन्ही विषय पुढच्या सभेत घेण्यांत यावे.

**प्रकरण क्र. ३१ :-**

महानगरपालिका वाहनांसाठी स्पेअरपार्ट पुरवठा करुन दुरुस्ती करणे कामी वार्षिक निविदांना मंजूरी देणे. (ग्रूप १ - ॲम्बेसेडर, कार, कॉन्टेसा कार, मारुती इस्टीम, फोर्ड आयकॉनव महिंद्रा जीप.)

**ठराव क्र. ३८ :-**

मा. सभापती सोा. यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत ठेवण्याचे सुचित करण्यांत आले.

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३२ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ३२ :-**

महानगरपालिका वाहनांसाठी स्पेअरपार्ट पुरवठा करुन दुरुस्ती करणे कामी वार्षिक निविदांना मंजूरी देणे. (ग्रूप २ - फायर फायटर, पाणी टँकर, धुर फवारणी मशीन, शव वाहिनी, फिरता दवाखाना, सक्शन, जेटींग, ॲम्बुलेन्स, कचरा वाहतूकीचे ट्रक, टेम्पो, महिन्द्रा ट्रॅक्टर)

**ठराव क्र. ३९ :-**

मा. सभापती सोा. यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत ठेवण्याचे सुचित करण्यांत आले.

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शरद पाटील :-**

मी मघाशी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर आता देणार आहात ना?

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, मघाशी सन्मा. सदस्य शरद पाटील ह्यांनी जो विषय ह्या ठिकाणी मांडला आणि उपायुक्त नाईक साहेब ह्या ठिकाणी होते. त्यावेळी अशा पद्धतीचे रुलिंग झाले होते की, सन्मा. नगरसेवकांचा जो निधी असतो त्या निधीतून जे काम होईल ती ज्याची निधी असेल त्याचेच नांव त्या ठिकाणी आले पाहिजे अशा पद्धतीचा ठराव आपण त्या ठिकाणी केला होता आणि आता पुन्हा आपण त्या ठरावामध्ये लेखी स्वरुपामध्ये वेगळ्या पद्धतीने दिलेले आहे त्याचा खुलासा सुस्पष्ट करावा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण विषय नीट समजावून घ्या.

**मा. सभापती :-**

माझी एक सुचना आहे हा विषय जर पुढे घ्यायचा त्याच्यापेक्षा डायरेक्ट कंपन्यांना गाड्या पाठवा ही विनंती करतो.

**याकुब कुरेशी :-**

अति उत्तम.

**मा. सभापती :-**

कंपनीकडे गाड्या पाठवल्या तर चांगल्या रिपेअरींग होतील अशी मी सुचना देतो.

**याकुब कुरेशी :-**

माझे अनुमोदन आहे ह्या ठरावाला आहे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेबांनी मांडलेल्या ठरावाला आणि सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

आपण आपल्या सगळ्या गाड्या कंपन्यांकडे पाठवा म्हणजे त्या गाड्या वारंवार बंद होणार नाही आणि रस्त्यात बंद पडणार राहणार नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्याच विषयाला आधारुन मंजुर करा.

**रिटा शाह :-**

बरोबर आहे साहेब, आपण गाड्या कंपन्यांना पाठवा.

**दिनेश नलावडे :-**

ह्या नविन गाड्या आहेत तोपर्यंत आपण त्या गाड्या कंपन्यांकडे पाठवणार. पण जी छोटी छोटी कामे निघतात जसे वाहनांचे पार्टस् निघतात तर आपण त्याकरिता ते वाहन कंपनीकडे पाठवू शकतो का? आपल्याला गॅरेज हे मंजूर करावे लागेल. कंपनीकडे गाडी पाठवल्यानंतर ती गाडी कंपनी एक ते दोन महिने ठेवून देते. सभापती साहेब, छोट्याशा कामाकरिता गाडी दोन महिने ठेवणार आहे. आपण सर्वांनी ह्याच्यावर व्यवस्थित विचार करा. सभापती साहेबांनी हा निर्णय घेतला ते तुमच्या भावना लक्षात घेऊनच विषय घेतला आहे.

**मोहन पाटील :-**

हा विषय पुढच्या सभेत येणारच आहे.

**चंद्रकांत वैती :-**

विषयपटलावर विषय येऊ द्या. त्यानंतर आपण विषय घ्या.

**दिनेश नलावडे :-**

आज सभापती साहेबांची जी सुचना आली आहे ती आपल्या सर्वांची भावना आणि कल्पना लक्षात घेऊन त्यांनी ती व्यक्त केलेली आहे. साहेब, आपण हे जर मंजूर केले तर पुढच्या वेळी आपलेच सदस्य बोलतील की, असे चालणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

गॅरेज नक्की करतांना दरवेळेला निरनिराळे नियम लावतात. मागच्या वेळेला काय झाले, स्थानिक गॅरेज पाहिजे. टँकर रिपेअरिंगला बदलापूरला गेले. आपल्या नगरपालिकेच्या डंपरने खेचत नेले तिथे, कशासाठी आपण ही मेहेरबानी करायची? लोकल गॅरेज ठेवा ना?

**चंद्रकांत वैती :-**

शरद पाटील ह्यांची जी सुचना होती. त्यांना जे बांधकाम खात्याने पत्र दिले होते त्याचा खुलासा झाला का? जर ठरावाप्रमाणे त्याचा खुलासा झालेला नसेल तर सदर पत्र रद्द करुन.

**दिपक खांबित :-**

ठरावाप्रमाणेच उत्तर आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ठरावात बदल झालेला आहे.

**चंद्रकांत वैती :-**

ठराव आणि ते पत्र आपण कम्पॅअर करा.

**दिपक खांबित :-**

ठराव आपण करुन देता.

**दिनेश नलावडे :-**

त्यावेळेचे माजी सभापती येथे आहेत.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, त्यावेळी होते तेव्हा विषय झाला आणि नाईक साहेब ही उपस्थित होते. तर ज्याचा निधी होता त्याचे नांव लावायचे असा विषय होता. तिघांनी खर्च केला तर तिघांचे नांव लावायचे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ठराव झाला त्याप्रमाणे कार्यवाही व्हायला पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

ह्याच्यावर चांगला उपाय म्हणजे, मिरा रोडमध्ये लिटरबिन लावले त्यावेळी मुझफ्फर साहेबांचे आणि माझे, मोदींचे असे तिघांची नांवे टाकली.

**मोहन पाटील :-**

एकत्र निधी असेल तेव्हा ना?

**चंद्रकांत वैती :-**

आम्हांला जे मान्य होते ते आम्ही करुन घेतले व संपूर्ण मिरा रोडमध्ये तिघांची नांवे लिहिली.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, ठरावात बदल झालेला आहे.

(श्री. दिपक खांबित यांनी मुळ ठरावाचे वाचन करुन दाखविले.)

**चंद्रकांत वैती :-**

ठरावाप्रमाणे योग्य तो निर्णय घ्या.

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०१.१५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**